नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : २६४ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




# महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




गुरुवार, दि. १० सप्टेंबर २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## थोडक्यात...

### रागातून विवाहिने संपविले जीवन

आडूळ (स. गांवकरी) : शिवण क्लास लावला नसल्याच्या कारणावरून घारेगाव (ता. पैठण) येथील गीता कार्तिक थोरे (वय-२३) या विवाहितेने विषारी औषध प्राशन करून जीवन संपविल्याची दुर्दैवी घटना बुधवारी (ता. ९) सकाळी उघडकीस आली. या घटनेमुळे घारेगाव परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गीता थोरे यांनी विषारी औषध प्राशन केले होते. बुधवारी सकाळी त्यांचे पती कार्तिक थोरे हे झोपेतून उठल्यानंतर गीता यांना उलट्या होत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यानंतर त्यांनी तातडीने गीतांना उपचारासाठी आडूळ येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले. मात्र, प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी डॉ. शोभा नागरे यांनी तपासणी केल्यानंतर गीतांना मृत घोषित केले. त्यानंतर आडूळ येथे त्यांच्या मृतदेहाचे शवविच्छेदन करण्यात आले. या घटनेची नोंद पाचोड पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. सहायक पोलिस निरीक्षक सचिन पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक शेषराव चव्हाण व रणजितसिंग दुल्हत पुढील तपास करीत आहेत. गीता थोरे यांच्या पश्चात दीड वर्षाचा मुलगा आहे. अल्पवयीन मुलावर मातृछत्र हरपल्याने कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून, या घटनेमुळे गावात शोककळा पसरली आहे.

### इराणची नवीन खेळी

मुंबई (स. गांवकरी) : होर्मुझच्या सामुद्रधुनीवर दबाव वाढल्यानंतर इराणने आता नवीन खेळी करत आपली सागरी बंधने थेट अरबी समुद्रापर्यंत वाढवण्याची घोषणा केली आहे. इराणच्या इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्सने चाबहारपासून ओमानचे आखात आणि अरबी समुद्रापर्यंत नवीन 'रेस्ट्रिक्टेड झोन' म्हणजेच 'नो-गो झोन' तयार करण्याची योजना आखली आहे. या प्रतिबंधित सागरी क्षेत्रातून जाणाऱ्या संशयित किंवा अमेरिकेशी संबंधित जहाजांवर कडक निर्बंध लादण्याची आणि कारवाई करण्याची तयारी इराणने केली आहे. याच दरम्यान, इराकी किनाऱ्याजवळ एका परदेशी तेल टँकरवर संशयित ड्रोन हल्ला झाल्याने या भागातील तणाव कमालीचा वाढला आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या अंदाजापेक्षा इराणची ताकद अधिक सिद्ध होत असून, अमेरिकेच्या आक्रमक कारवाया आणि सर्वोच्च नेत्यावरील हल्ल्यांनंतरही इराण मागे हटायला तयार नाही. अमेरिकन हल्ल्यांना सामोरे जात आयआरजीसीने आधी होर्मुझचा वापर हत्यारासारखा केला, ज्यामुळे अमेरिकेवर मोठा दबाव निर्माण झाला होता. आता इराणने होर्मुझच्या पुढे पाऊल टाकत अशा सागरी क्षेत्रांवर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न सुरू केला आहे.

### गुणपडताळणीसाठी अर्जाची संधी

मुंबई (स. गांवकरी) : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (MPSC) राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२५ च्या उमेदवारांसाठी महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. मुख्य परीक्षेच्या निकालानंतर काही उमेदवारांच्या गुणांमध्ये मोठी तफावत आढळून आल्याने विद्यार्थ्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांची दखल घेत आयोगाने गुणांच्या फेरपडताळणीची संधी उपलब्ध करून दिली आहे. इच्छुक उमेदवारांना १० सप्टेंबर २०२६ पर्यंत ऑनलाइन अर्ज करता येणार आहे. एमपीएससीने २५ ऑगस्ट २०२६ रोजी राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२५ च्या लेखी परीक्षेचा निकाल जाहीर केला होता. निकालानंतर मुलाखतीसाठी पात्र न ठरलेल्या काही उमेदवारांच्या गुणपत्रिकेत अत्यंत कमी गुण दिसून आल्याने चर्चेला सुरुवात झाली. काही पेपरमध्ये २५० पैकी केवळ २, ६, ११ आणि १४ गुण मिळाल्याचे समोर आले होते.

# मराठ्यांचे वाटोळे करणारे तुम्हाला चालणार का?

## जरांगेंच्या उपोषणाचा १२वा दिवस : उदय सामंत यांचे कोंडी फोडण्याचे आवाहन, आकडेवारीच मांडली

आंतरवाली सराटी : (स. गांवकरी)

मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाचा आज 12 वा दिवस आहे. आंतरवाली सराटीमध्ये 12 तारखेला राज्यव्यापी बैठक होणार आहे. या बैठकीत मुंबईला जाण्याची तारीख स्पष्ट केली जाणार आहे. काल मराठा आंदोलकांनी आक्रमक होत आंदोलन केले आहेत. मनोज जरांगे पाटील मुंबईत जाण्यापूर्वी सरकार काही तोडगा काढणार का? हे पाहणं महत्त्वाचे आहे.

मनोज जरांगे पाटील म्हणाले की, मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्राद्वारेच ओबीसी प्रवर्गातून आरक्षण हवे आहे. मात्र, राज्य सरकारचा मराठ्यांचे वाटोळे करण्याचा त्यांचा कट आहे. तुम्ही काहीही करा, आम्हाला मारून टाका; पण आम्ही आरक्षणाच्या मागणीपासून आता एक पाऊलही मागे हटणार नाही. आत्महत्यांनी या निर्दयी सरकारला काहीही फरक पडत नाही, उलट हा शिंदे-फडणवीस सरकारने घेतलेला बळी आहे. त्यामुळे समाजाने हतबल न होता एकत्र येत सरकारला गुडघ्यावर आणण्यासाठी लढावे, पण कोणीही टोकाचे पाऊल उचलू नका.

महायुती सरकारने मराठा समाजाचे जे वाटोळे केले आहे, ते मराठा समाजाला पटले आहे का? एकनाथ शिंदे यांनी संजय शिरसाटकडून कुणबी नोंदींची प्रमाणपत्रे



रद्द करून घेतली आहेत. सध्या जे समर्थक रस्त्यावर उतरून विरोध करत आहेत, ते स्वतः एकनाथ शिंदे यांनीच घडवून आणले आहे. कारण त्यांची भीती आता स्पष्ट दिसत आहे. परंतु, अशा प्रकारे फुकट जमवलेली ताकद जास्त दिवस टिकत नाही, असा आरोप मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे.

मनोज जरांगे म्हणाले की, जे लोक सध्या एकनाथ शिंदेंच्या समर्थनात बोलत आहेत, त्यांना कुणबी प्रमाणपत्रे रद्द होत आहेत हे समजत नाही का? तुम्हाला तुमच्या जातीशी काही देणेघेणे उरले नाही का? तुमचा बाप तोच आहे का? मी माझी भाषा बदलणार नाही; उलट ज्यांनी मराठ्यांची प्रमाणपत्रे रद्द केली आहेत, त्यांच्याविरोधात माझी भाषा यापुढे आणखी तीव्र आणि कडक होणार आहे. एकनाथ शिंदे जर मराठ्यांनाच मराठ्यांच्या अंगावर सोडणार असतील, तर शिंदे आणि त्यांची शिवसेना पूर्णपणे संपून जाईल. उद्योगमंत्री उदय सामंत हे संयम बाळगण्याचे आवाहन करत आहेत; पण जर मराठा समाजाचाच संयम सुटला, तर ते काय करणार आहेत?

उदय सामंत म्हणाले की, "मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा केल्यानंतर आम्ही छत्रपती संभाजीनगरमध्ये मराठवाड्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली. मराठा समाजाला कुणबी दाखले देण्याच्या प्रक्रियेचा आणि न्यायमूर्ती शिंदे समितीच्या कार्यवाहीचा आम्ही सविस्तर आढावा घेतला. तोडग्याच्या अनुषंगाने सरकार एक पाऊल नाही तर दहा आणि शंभर पावले पुढे आले आहे. मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले आहे की चर्चेची सर्व दारे खुली आहेत. त्यामुळे आता जरांगे पाटलांनी सकारात्मक प्रतिसाद देऊन ही कोंडी सोडवावी."

असा सवाल त्यांनी उपस्थित केला. मराठा आरक्षणाच्या संदर्भात राज्य सरकार मराठा समाजाला न्याय हक्क मिळवून देण्यासाठी कटिबद्ध असून, मराठवाडा विभागात कुणबी प्रमाणपत्र आणि जात पडताळणी दाखले देण्याची प्रक्रिया अत्यंत जलदगतीने सुरू असल्याचे प्रतिपादन राज्याचे मंत्री उदय सामंत आणि आमदार प्रसाद लाड यांनी केले आहे. आजच्या पत्रकार परिषदेत त्यांनी मराठवाड्यातील जात प्रमाणपत्रांच्या अद्ययावत आकडेवारीची माहिती दिली.

# वीज कंपन्यांचे खासगीकरण नाही; कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा

मुंबई : (स. गांवकरी)

महाराष्ट्रातील महावितरण, महानिर्मिती आणि महापारेषण या राज्य शासनाच्या मालकीच्या वीज कंपन्यांचे कोणत्याही पद्धतीने खासगीकरण केले जाणार नाही, अशी स्पष्ट ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. वीज कंपन्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करून नफ्यात आणणे आणि पायाभूत सुविधा मजबूत करणे, हे सरकारचे धोरण असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सह्याद्री अतिथीगृह, मुंबई येथे वीज कर्मचारी, अभियंते व अधिकारी कृती समितीसोबत झालेल्या बैठकीत खासगीकरण, पेन्शन, बोनस, कंत्राटी कामगार, पुनर्रचना, पदोन्नती आदी १८ प्रलंबित मागण्यांवर चर्चा झाली. ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, तिन्ही वीज कंपन्यांचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक तसेच महाराष्ट्र वीज कामगार महासंघाचे महामंत्री अरुण पिवळ अध्यक्ष विठ्ठल भालेराव यांच्यासह १८ कामगार संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

मागील दिवाळीत रोखण्यात आलेला वीज कर्मचाऱ्यांचा बोनस तातडीने देण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी व्यवस्थापनाला दिले. महावितरणच्या पुनर्रचनेविरोधातील संपानंतर कर्मचाऱ्यांवर करण्यात आलेल्या न्यायालयीन कारवाया, परिपत्रक क्रमांक ५५५५ अंतर्गत कारवाई आणि वेतनकपात रद्द करण्याचे निर्देशही देण्यात आले. संपातील दोन दिवसांचा पगार रजा म्हणून



- रोखलेला बोनस देण्याचे आदेश
- संपातील कारवाया रद्द करण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश

भरून देण्याचेही आदेश देण्यात आले.

महावितरणवरील सुमारे ८० हजार कोटी रुपयांच्या कर्जाची जबाबदारी राज्य शासन टप्प्याटप्प्याने स्वीकारणार असून, कंपनीच्या १० टक्के शेअर्सच्या लिस्टिंगद्वारे भांडवल उभारण्याचा प्रस्ताव असल्याचे बैठकीत स्पष्ट करण्यात आले.

कंत्राटी कामगारांना हरियाणा पॅटर्ननुसार स्थायी रोजगार देण्याच्या मागणीवर एका महिन्यात अभ्यास करून प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. मयत कर्मचाऱ्यांच्या वारसांना सहाय्यक पदाऐवजी सरळ भरतीद्वारे स्थायी पदावर सामावून घेण्याचे निर्देशही देण्यात आले.

महावितरणच्या कार्यक्षेत्रात खासगी कंपन्यांना समांतर वीज वितरणाचा परवाना दिला जाणार नाही, अशी भूमिका मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केली.

# रिंग रोडसाठी महापालिकेवर एक हजार कोटीचे दायित्व

पुणे : (स. गांवकरी)

पुणे शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी प्रस्तावित इनर रिंग रोडसाठी महापालिकेला तब्बल १ हजार ८८ कोटी ४० लाख रुपयांचा भूसंपादन खर्च पेलावा लागणार आहे. वडाचीवाडी, पिसोळी, येवलेवाडी, गुजर-निंबाळकरवाडी, मांगडेवाडी, भिलारेवाडी, आंबेगाव खुर्द आणि जांभूळवाडी या आठ गावांतील ७ लाख २३ हजार १९६ चौरस मीटर जमीन संपादित केली जाणार आहे. इनर रिंग रोड आणि एचसीएमटीआर प्रकल्पाच्या अंमलबजावणीबाबत मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली २७ जुलैला बैठक झाली होती. त्यानंतर २८ ऑगस्टला महापालिका आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत भूसंपादनाचे प्रस्ताव ३१ ऑगस्टपर्यंत सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. त्यानुसार प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर



करण्यात आला आहे. नवीन भूसंपादन कायद्यानुसार कलम १९ ची अधिसूचना काढण्यापूर्वी ३० टक्के रक्कम भरण्याची तरतूद आहे. मात्र, अंतिम निवाड्याच्या वेळी संपूर्ण नुकसानभरपाईची रक्कम जमा करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. संबंधित संस्थांनीही त्यांच्या कार्यक्षेत्रातील भूसंपादन खर्चाचा प्रमाणानुसार भार उचलावा, असे निर्देश आहेत. या प्रक्रियेला स्थायी समितीमार्फत मुख्य सभेची मान्यता घेण्यात येणार आहे.

# पार्थ पवारांना आरोपी का केले नाही? : हायकोर्टाचा सवाल

पुणे/मुंबई : (स. गांवकरी)

पुण्यातील बहुचर्चित आणि तब्बल १८०० कोटी रुपयांच्या मुंढवा जमीन खरेदी प्रकरणात आता एक अत्यंत मोठी घडामोड समोर आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा खासदार पार्थ पवार यांना या प्रकरणात अद्याप आरोपी का करण्यात आले नाही? असा थेट सवाल मुंबई उच्च न्यायालयाने पोलिसांना विचारला आहे. तसेच, याप्रकरणी राज्याचे पोलीस महासंचालक आणि तपास अधिकाऱ्यांनी उत्तर द्यावे, असे स्पष्ट आदेशही न्यायालयाने दिले आहेत. उच्च न्यायालयाच्या या दणक्यामुळे पार्थ पवार यांच्या अडचणीत मोठी वाढ होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

मुंढवा जमीन गैरव्यवहार प्रकरणी दाखल याचिकेवर मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती माधव जामदार यांच्या एकलपीठासमोर सुनावणी पार पडली. यावेळी हायकोर्टाने पोलिसांच्या तपासावर ताशेरे ओढले. या प्रकरणात पार्थ पवार यांच्यावर गुन्हा का दाखल करण्यात



आला नाही आणि त्यांना का आरोपी केले नाही, अशी विचारणा करत न्यायालयाने पोलिसांना धारेवर धरले. या प्रकरणाची पुढील सुनावणी आता २८ सप्टेंबरला होणार असून, पोलीस काय उत्तर देणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

या संपूर्ण प्रकरणाच्या चौकशीसाठी विकास खारगे यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या समितीने आपला ४ हजार ३९२ पानांचा जंबो अहवाल नुकताच विधिमंडळात सादर केला आहे. समितीने एकूण ७ बैठका घेऊन हा अहवाल तयार केला आहे. या अहवालात कुणालाही स्पष्टपणे क्लीन चीट देण्यात आलेली नाही. अहवालात पार्थ पवार यांच्यावर थेट कारवाईचा उल्लेख नसला तरी, भविष्यात फौजदारी तपासात अधिक लोकांचा सहभाग आढळल्यास कारवाई होऊ शकते, असे नमूद करण्यात आले आहे. तसेच, शासकीय जमिनीचे नियमबाह्य हस्तांतरण करण्यासाठी दस्त नोंदवल्याची गंभीर बाब समोर आली असून, नोंदणी प्रक्रियेतील महसूल, मुद्रांक व नोंदणी अधिकाऱ्यांची चूक ठळकपणे मांडण्यात आली आहे. याप्रकरणी संबंधित तहसीलदार आणि दुय्यम निबंधकांवर बडतर्फीची शिफारस करण्यात आली आहे.

पुण्यातील कोरेगाव पार्क लगतच्या मुंढवा परिसरातील सुमारे ४० एकर जमिनीचा हा वाद आहे. ही जमीन १८१९ मध्ये 'महार वतन' म्हणून देण्यात आली होती. त्यानंतर १९५७ मध्ये ती सरकारजमा झाली आणि १९६२ मध्ये भारतीय वनस्पती सर्वेक्षण केंद्राला भाडेतत्त्वावर देण्यात आली. यापैकी केवळ ३ एकरांवर कामकाज सुरू होते, तर उर्वरित जमीन जंगल स्वरूपात होती. मात्र, २००६ मध्ये वतनदारांकडून शीतल तेजवानी यांना 'पॉवर ऑफ अटर्नी' देण्यात आली आणि त्यानंतर ही जमीन पार्थ पवार यांच्या 'अमीडिया' कंपनीकडे हस्तांतरित करण्यात आली. सद्यस्थितीत या ४० एकर जमिनीचा बाजारभाव तब्बल १८०० कोटी रुपये सांगितला जातो.

# जमिनीचा जुना इतिहास ते रेडी रेकनरचा दर

## एका क्लिकवर मिळणार सगळी माहिती, महसूलमंत्री बावनकुळेंनी सुरू केले 'महाभूमी स्टॅक'

मुंबई : (स. गांवकरी)

राज्यातील जमिनीच्या खरेदी-विक्री आणि इतर सर्व व्यवहारांमध्ये पारदर्शकता आणि सुलभता आणण्यासाठी राज्य सरकारने 'महाभूमी स्टॅक' नावाचे एकात्मिक डिजिटल प्रवेशद्वार (ॲप) विकसित केले आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज पत्रकार परिषदेत या ऐतिहासिक निर्णयाची घोषणा केली. याचबरोबर, राज्यातील आदिवासी शेतकऱ्यांना वनपट्टे आणि जमिनीचे मालकी हक्क देण्यासाठी 17 सप्टेंबर ते 2 ऑक्टोबरदरम्यान एक विशेष मोहीम राबवण्यात येणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

बावनकुळे यांनी सांगितले की, "आम्ही महाभूमी स्टॅक ॲप डेव्हलप केले आहे. यामध्ये विखुरलेल्या विविध प्रणालींचे एकत्रीकरण करून 10 प्रमुख भूमी सेवांसाठी ही एकच प्रणाली तयार करण्यात आली आहे. तब्बल 36 कोटी जुने दस्तऐवज स्कॅन करण्यात आले आहेत." या प्रणालीमुळे दीड कोटी भू-नकाशे, 40 कोटी जुने फेरफार आणि



नोंदणी दस्त एकाच क्लिकवर उपलब्ध होणार आहेत. सरकारी आणि खाजगी जमिनींचा जुना इतिहास, सध्याची स्थिती, मोजणीचा तपशील आणि रेडी रेकनरनुसार जमिनीचे व्हॅल्युएशन ही सर्व माहिती ॲपवर उपलब्ध असेल. यामुळे राज्यातील नागरिकांना आणि शेतकऱ्यांना आता तलाठी, तहसीलदार किंवा भूमी अभिलेख कार्यालयात हेलपाटे मारावे लागणार नाहीत. राज्यातील दीड ते दोन लाख आदिवासी शेतकरी असे आहेत जे वर्षानुवर्षे जमीन कसत आहेत, परंतु त्यांच्याकडे जमिनीचा मालकी हक्क (प्रॉपर्टी कार्ड/सातबारा) नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार, अशा सर्व आदिवासी शेतकऱ्यांना वनपट्टे देण्यासाठी विशेष सर्वेक्षण मोहीम हाती घेण्यात आली आहे.

17 सप्टेंबर ते 1 ऑक्टोबर: पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसापासून (17 सप्टेंबर) ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीपर्यंत (2 ऑक्टोबर) ही 15 दिवसांची मोहीम चालेल. 17 ते 19 ऑक्टोबर: ग्रामस्तरावरील वन हक्क समित्यांच्या बैठका होतील. ज्यांना वनपट्टे मिळाले नाहीत किंवा अपुरे मिळाले आहेत, त्यांचे अर्ज स्वीकारले जातील. 30 सप्टेंबर ते 2 ऑक्टोबर: ग्रामसभा घेऊन या दाव्यांना मंजुरी दिली जाईल. त्यानंतर उपविभागीय आणि जिल्हास्तरीय वन हक्क समिती याला मान्यता देईल. आगामी तीन महिन्यांच्या आत महसूल विभागामार्फत या सर्व आदिवासी शेतकऱ्यांना नवीन प्रॉपर्टी कार्ड (सातबारा) दिले जाईल, असे बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

विकासाच्या प्रकल्पांमध्ये (उदा. रस्ते, रेल्वे) वनजमिनी आडवी येत असल्याने अनेक प्रकल्प रखडतात. यावर तोडगा म्हणून महसूल आणि वन विभागाने एक नवीन 'लँड बँक' आणि सॉफ्टवेअर तयार केले आहे. याअंतर्गत, जर एखाद्या प्रकल्पासाठी वनजमीन द्यावी लागली, तर तातडीने दुसरीकडे त्याच्या दुप्पट पर्यायी जमीन वनीकरणासाठी उपलब्ध करून दिली जाईल. यामुळे वनजमिनीच्या मंजुरीसाठी लागणारी दोन-दोन वर्षे आता वाचतील आणि प्रकल्प गतीने पूर्ण होतील, असा विश्वास बावनकुळे यांनी व्यक्त केला.

# संसदेत ठाण्याचा बोलबाला! म्हस्के, शिंदेंना सलग दुसऱ्यांदा 'संसदरत्न'



ठाणे : (स. गांवकरी)

ठाण्याच्या राजकारणात आरोप-प्रत्यारोपांची धुळवड सुरू असताना दिल्लीच्या संसदेत मात्र ठाण्याचा झेंडा पुन्हा उंचावला आहे. ठाण्याचे खासदार नरेश म्हस्के आणि कल्याणचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या संसदीय कामगिरीची राष्ट्रीय पातळीवर दखल घेत त्यांना सलग दुसऱ्यांदा 'संसदरत्न' पुरस्काराने गौरविण्यात आले. एकाच परिसरातील दोन खासदारांना सलग दुसऱ्यांदा हा सन्मान मिळाल्याने ठाण्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. नवी दिल्लीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवनातील भीम हॉलमध्ये बुधवारी झालेल्या सोहळ्यात केंद्रीय कोळसा व खाणमंत्री जी. किशन रेड्डी, केंद्रीय शिक्षण राज्यमंत्री डॉ. सुकांता मजुमदार, माजी सरन्यायाधीश न्यायमूर्ती बी. आर. गवई आणि पुरस्कार ज्युरी समितीचे अध्यक्ष हंसराज अहिर यांच्या उपस्थितीत दोन्ही खासदारांचा गौरव करण्यात आला. खासदार म्हस्के यांनी संसदेत मतदारसंघातील प्रश्नांसह रेल्वे, पायाभूत सुविधा, नागरी सुविधा, नगरविकास आणि गृहनिर्माणाशी संबंधित मुद्दे सातत्याने उपस्थित केले. विविध कायदे, सरकारी धोरणे आणि लोकहिताच्या विषयांवर प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून सरकारचे लक्ष वेधले. संसदीय समित्यांमध्येही सक्रिय सहभाग नोंदवत त्यांनी ठाण्याशी संबंधित प्रलंबित प्रश्नांचा पाठपुरावा केला.

## थोडक्यात पण महत्वाचे



### आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनानिमित्त बक्षीस वितरण समारंभ

मंचर (स. गांवकरी) : IMC India आणि Room to Read यांच्या संयुक्त विद्यमाने लांडेवाडी शाळेतील इयत्ता 1 ली ते 5 वी च्या विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत शाळेतील तब्बल 50 विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देणाऱ्या या स्पर्धेतून 10 विद्यार्थ्यांची विजेते म्हणून निवड करण्यात आली. आज आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनानिमित्त या विजेत्या विद्यार्थ्यांना पालक, SMC सदस्य आणि शिक्षक यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. याचबरोबर IMC India यांच्या वतीने लांडेवाडी शाळेला ₹20,000/- (वीस हजार रुपये) रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणाऱ्या लांडेवाडी शाळेतील सर्व शिक्षकांचेही मनःपूर्वक अभिनंदन व आभार मानले.

### ॲड. सदावर्ते यांच्यावर सोलापुरातील शिवसैनिकांचा संताप अनावर



सोलापूर (स. गांवकरी) : शिवसेना भवनावरील शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा फोटो १५ दिवसांत हटवण्याचा अल्टिमेटम देणाऱ्या ॲड. गुणरत्न सदावर्ते यांच्यावर शिवसैनिकांचा संताप अनावर झाला आहे. ठाकरे सेनेचे आक्रमक शिवसैनिक अतुलराजे भवर यांनी थेट व्हिडिओ जारी करत सदावर्तेंचा अत्यंत जळजळीत शब्दांत पंचनामा केला आहे. "हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे हे आमचे दैवत आहेत. पुण्यात अमित ठाकरेंनी वसतिगृहातून मोदींचा फोटो काढल्यानंतर, दिल्लीच्या बापाने आदेश दिल्यावर हा सदावर्ते लगेच भुंकू लागला आहे! सरकारचे तुकडे खाऊन, त्यांची सुरक्षा घेऊन फिरणाऱ्या या पाळीव प्राण्याने बाळासाहेबांवर बोलण्याची औकात ठेवली नाही पाहिजे. जर एका बापाची औलाद असशील, तर १५ दिवसांत दादरमधील शिवसेना भवनाच्या चौकात पाय ठेवून दाखव! येताना मात्र घरी सांगून ये की मी परत जिवंत जाईन की नाही! नाहीतर तू १०० बापांची औलाद आहेस हे संपूर्ण महाराष्ट्र समजेल!" असा थेट निर्वाणीचा इशारा भवर यांनी दिला आहे!



### शिक्षकांच्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास : आण्णासाहेब दिवे!

गणोरे (स. गांवकरी) : शिक्षक विद्यार्थ्यांना चांगले संस्कार देऊन जबाबदार व आदर्श नागरिक घडविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करतात. विद्यार्थी आपल्या शिक्षकांकडे मोठ्या अपेक्षेने पाहत असतात. त्यांच्या मनात असलेल्या मोठमोठ्या स्वप्नांना खऱ्या अर्थाने आकार देण्याचे काम शिक्षक करतात, असे प्रतिपादन गणोरे येथील रयत शिक्षण संस्थेच्या छत्रपती शिवाजी विद्यालयाचे मुख्याध्यापक आण्णासाहेब दिवे यांनी केले. अकोले तालुक्यातील गणोरे येथील छत्रपती शिवाजी विद्यालयात ५ सप्टेंबर रोजी शिक्षकदिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी मुख्याध्यापक आण्णासाहेब दिवे, गणोरे गावातील सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक माधव आंबरे गुरुजी, पत्रकार जगन्नाथ आहेर तसेच विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक भांगरे आर. डी. यांच्या हस्ते सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. मंगेश कडलग सर यांनी केले. विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना वाव मिळावा, तसेच शिक्षकांच्या भूमिकेचा अनुभव विद्यार्थ्यांना मिळावा, या उद्देशाने शिक्षकदिनाचे आयोजन करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. शिक्षकदिनानिमित्त विद्यार्थ्यांनी दिवसभर शिक्षकाची भूमिका बजावत अध्यापन प्रक्रियेचा अनुभव घेतला. शिक्षकांच्या मार्गदर्शनातूनच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. समारोपाच्या कार्यक्रमात अनेक विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करून शिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त केली. अतिशय आनंदी व खेळीमेळीच्या वातावरणात शिक्षकदिनाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला.



### आमदार नंदकिशोर माहाजन यांच्या वाढदिवसानिमित्त शैक्षणिक साहित्य वाटप

रावेर (स. गांवकरी) : तालुक्यातील सर्वांचे आवडते , व लोकप्रिय , नवनिर्वाचित विधान परिषद आमदार नंदकिशोर भाऊ माहाजन यांच्या वाढदिवसानिमित्त धामोडी तालुका रावेर येथिल मराठी मुलांच्या शाळेत पहिली ते चौथी वर्गातिल शालेय विद्यार्थ्यांना शैक्षाणिक साहित्य वाटप करण्यात आले. त्यात प्रामुख्याने, पाढे चार्ट , व इंग्रजी मुळ अक्षरांचा चार्ट , तसेच इतर साहित्याचं समावेश होता. ग्रामिण भागातील शालेय विद्यार्थ्यांना मराठी शुद्ध लेखन व वाचनाची गोडी निर्माण व्हावी व जिल्हा परिषदेच्या शाळांना चालना मिळावी या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी भारतीय जानता पार्टीचे रावेर तालुका अध्यक्ष दुर्गादास भाऊ पाटील, उपाध्यक्ष नितिन पाटील, जगदीश पाटील , ओबीसी तालुका उपाध्यक्ष संदीप पाटील , किसान मोर्चा उपाध्यक्ष राजेंद्र पाटील , कार्यक्रमाचे अध्यक्ष शशीकांत माधव पाटील हे होते,प्रमोद पाटील, पवन पाटील ,सरपंच विलास पाटील, स्वप्नील पाटिल , शेरा कोळी , सिद्धांत सर , मनोगत जगदिश पाटील यांनी व्यक्त केले .

### जिल्ह्यात शस्त्र व जमावबंदी आदेश लागू

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : आगामी सण, उत्सव, आंदोलने, मोर्चे तसेच विविध कार्यक्रमांच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये नांदेड जिल्ह्यात प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्यात आला आहे. अपर जिल्हादंडाधिकारी किरण अंबेकर यांनी हा आदेश जारी केला असून दि. ९ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ६ वाजेपासून ते दि. २३ सप्टेंबर २०२६ रोजी मध्यरात्री १२ वाजेपर्यंत हा आदेश लागू राहणार आहे. या कालावधीत नांदेड जिल्ह्यात सार्वजनिक ठिकाणी किंवा त्याच्या आसपास पाच किंवा पाचपेक्षा अधिक व्यक्तींनी एकत्र जमण्यास मनाई करण्यात आली आहे.

# स्वारातीम विद्यापीठातील दोन प्राध्यापकांचा गौरव

**कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार व डॉ. शैलेश वाढेर यांना राज्यस्तरीय सन्मान; विद्यापीठाच्या शैक्षणिक गुणवत्तेला नवी उंची**

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)



महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागातर्फे प्रदान करण्यात येणारा अत्यंत प्रतिष्ठित 'डॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार' स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील दोन वरिष्ठ प्राध्यापकांना जाहीर झाला आहे. विद्यापीठाच्या शैक्षणिक व प्रशासकीय गुणवत्तावाढीसाठी केलेल्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेत वर्ष २०२४-२५ साठी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार आणि वर्ष २०२५-२६ साठी नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. शैलेश वाढेर यांना हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील शैक्षणिक संस्था, महाविद्यालये आणि विद्यापीठ परिसरात समर्पित भावनेने कार्य करणाऱ्या प्राध्यापकांच्या योगदानाचा गौरव करणे हा या पुरस्काराचा प्रमुख उद्देश आहे. २५ हजार रुपये रोख, शाल, श्रीफळ आणि सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. विद्यापीठ कार्यक्षेत्रात प्रशासकीय गतिशीलता व पारदर्शकता, विद्यार्थी-केंद्रित उपक्रम, संशोधन संस्कृतीचा विकास तसेच विविध शैक्षणिक भागीदारींच्या माध्यमातून गुणवत्तावाढीसाठी कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार आणि नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. शैलेश वाढेर यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांच्या कार्याची राज्य शासनाने घेतलेली दखल ही विद्यापीठासाठी अभिमानाची बाब मानली जात आहे.

हा पुरस्कार महाराष्ट्राचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर आणि कला शिक्षण संचालक डॉ. किशोर इंगळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या उल्लेखनीय यशाबद्दल स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर आणि प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांनी कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार व नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. शैलेश वाढेर यांचे अभिनंदन केले. तसेच व्यवस्थापन परिषद, विद्या परिषद व अधिसभेचे सदस्य, विद्यापीठातील प्राध्यापक आणि अधिकारी-कर्मचाऱ्यांनी त्यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या. "कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या नेतृत्वाखाली स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाला वर्ष २०२४-२५ आणि २०२५-२६ अशा सलग दोन वर्षांसाठी डॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार प्राप्त होणे ही अत्यंत समाधानाची बाब आहे. या सन्मानामुळे विद्यापीठाचा शैक्षणिक क्षेत्रातील बहुमान निश्चितच अधिक उंचावला आहे," अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

डॉ. ज्ञानेश्वर पवार आणि डॉ. शैलेश वाढेर यांनी पुरस्काराबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना सांगितले की, "हा सन्मान आम्ही आमचे विद्यार्थी, सहकारी आणि समाजाला समर्पित करीत आहोत. नियमित अध्यापन, संशोधन आणि विद्यापीठाच्या प्रगतीसाठी प्रामाणिकपणे कार्य करणे हीच आमची खरी ओळख आहे."

दोन्ही प्राध्यापकांना मिळालेला हा राज्यस्तरीय सन्मान विद्यापीठाच्या शैक्षणिक गुणवत्तेला बळ देणारा असून, विद्यापीठ कार्यक्षेत्रात उच्च शिक्षणाची गुणवत्ता अधिक दृढ करण्यासाठी तसेच प्राध्यापकांना उत्कृष्ट कार्याची प्रेरणा देण्यासाठी ही उपलब्धी निश्चितच मार्गदर्शक ठरेल.

## जी. एम. जाधव विद्यालयाचा दोन्ही संघांची यशस्वी घोडदौड

कल्याण : (स. गांवकरी)



ठाणे जिल्हा आट्या पाट्या असोसिएशन च्या माध्यमातून नानासाहेब फडके क्रीडा संकुल कल्याण येथे झालेल्या स्पर्धेत जी. एम. जाधव विद्यालय आसनगाव च्या मुली व मुलांनी प्रथम क्रमांक पटकावला तर मुलींमध्ये द्वितीय क्रमांक लोकमान्य गुरुकुल, डोंबिवली, तृतीय क्रमांक शिवाई विद्यालय इंग्लिश मिडीयम स्कूल, ठाणे आणि मुलांमध्ये द्वितीय क्रमांक भारतीय सैनिकी विद्यालय, खडवली, तृतीय क्रमांक सिद्धार्थ विद्यामंदिर माध्यमिक, कल्याण यांनी पटकावला. सब ज्युनिअर आट्या पाट्या स्पर्धेच्या उद्‌घाटन प्रसंगी राष्ट्रीय शिक्षण संस्थेचे कार्यकारिणी सदस्य आर. डी. पाटील, महात्मा गांधी विद्यामंदिर, डोंबिवली शाळेचे मुख्याध्यापक सुनील कांबळी हे मान्यवर उपस्थित होते. तसेच आट्या पाट्या असोसिएशनचे पदाधिकारी उदय नाईक, लक्ष्मण इंगळे, राजेंद्र शेटे, प्रवीण खाडे, अविनाश नलावडे, सुभाष गायकवाड, आशा परब, अंकुर आहेर यांनी विशेष उपस्थिती दिली. या स्पर्धेत कल्याण, डोंबिवली, शहापूर, ठाणे शहर येथील शाळा व क्रीडा मंडळांनी मोठा सहभाग नोंदवला. पंच मंडळ अध्यक्ष मिलिंद धंबा यांच्या नेतृत्वाखाली सर्व पंचांनी उत्कृष्ट काम केले. निवड समितीवर आट्या पाट्या आंतरराष्ट्रीय खेळाडू अनुराधा मोरे, वैभवी चव्हाण यांनी २५ मुली व २५ मुलांची निवड केली. निवड झालेल्या खेळाडूंचे शिबिर घेण्यात येणार असून त्यात राज्य स्पर्धेसाठी १५ मुली व मुलांचा अंतिम संघ निवडला जाणार आहे, असे सहसचिव एजाज तडवी यांनी सांगितले.

## 'नर्व्ह कंडक्शन स्टडीज'मुळे न्यूरोलॉजिकल आजारांचे अचूक निदान शक्य

**अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख : रुग्णसेवेत या तंत्रज्ञानाचा प्रभावी उपयोग करण्याचे आवाहन**

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

> नर्व्ह कंडक्शन स्टडीजच्या अचूक विश्लेषणातून महत्त्वपूर्ण वैद्यकीय माहिती मिळू शकते. यामुळे प्राध्यापक व संशोधकांना संशोधनाच्या नव्या दिशा उपलब्ध होण्यास मदत होईल. विशेषतः न्यूरोपॅथी, अर्धांगवायू, गिलियन-बॅरे सिंड्रोम (GBS) आणि मधुमेहजन्य न्यूरोपॅथी यांसारख्या आजारांचे वेळेत व अचूक निदान करण्यासाठी या तंत्रज्ञानाचे महत्त्व मोठे आहे. अचूक निदानामुळे रुग्णांना वेळेत उपचार मिळून न्यूरोलॉजिकल आजारांमुळे होणारे अपंगत्व कमी करण्यास तसेच रुग्णांचे जीवनमान सुधारण्यास मदत होईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

न्यूरोलॉजिकल आजारांचे वेळेत व अचूक निदान करून रुग्णांना योग्य उपचार उपलब्ध करून देण्यासाठी 'नर्व्ह कंडक्शन स्टडीज' हे अत्यंत उपयुक्त तंत्रज्ञान आहे. ही चाचणी केवळ सैद्धांतिक संकल्पना नसून आधुनिक चिकित्साशास्त्रातील महत्त्वाचा आधार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी व वैद्यकीय अधिकाऱ्यांनी या तंत्रज्ञानाचे व्यावहारिक ज्ञान आत्मसात करावे, असे आवाहन डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख यांनी केले. डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, विष्णुपुरी, नांदेड येथील शरीरक्रियाशास्त्र विभागाच्या वतीने 'Demystifying Nerve Conduction Studies' या विषयावर दि. 5 सप्टेंबर 2026 रोजी सातत्यपूर्ण वैद्यकीय शिक्षण (CME) कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्‌घाटन अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमास मुंबई येथील ज्येष्ठ न्यूरोफिजिओलॉजिस्ट डॉ. आर्थिका श्रीनिवासन तसेच नांदेड येथील सल्लागार न्यूरोफिजिओलॉजिस्ट डॉ. मयुरा धोंडे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी शरीरक्रियाशास्त्र विभागाच्या प्राध्यापक तथा विभागप्रमुख डॉ. वंदना दुधमल यांनी प्रास्ताविक करून कार्यक्रमाची रूपरेषा स्पष्ट केली. वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या संचालक डॉ. पल्लवी सापळे यांनी भ्रमणध्वनीद्वारे आयोजकांना शुभेच्छा दिल्या. तसेच संदेशाद्वारे त्यांनी या CME कार्यक्रमामुळे सैद्धांतिक ज्ञान आणि त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी यांमधील दरी भरून काढण्यासाठी उत्कृष्ट व्यासपीठ उपलब्ध होईल, असे नमूद केले. अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख यांनी सांगितले की, नर्व्ह कंडक्शन स्टडी ही क्लिनिकल न्यूरोलॉजीचा महत्त्वपूर्ण आधार आहे. विद्यार्थ्यांनी केवळ सैद्धांतिक ज्ञान न घेता नर्व्ह कंडक्शन कसे मोजले जाते, त्यातून प्राप्त होणारे आलेख कसे वाचायचे आणि त्याचे चिकित्सकीय विश्लेषण कसे करायचे, याचे प्रत्यक्ष ज्ञान मिळविणे आवश्यक आहे. महाविद्यालयात प्रथमच नर्व्ह कंडक्शन स्टडीज (NCV Studies) सेवा सुरू केल्याबद्दल डॉ. देशमुख यांनी शरीरक्रियाशास्त्र विभागप्रमुख डॉ. वंदना भारतराव दुधमल व विभागातील शिक्षकवृंदांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. प्रमुख वक्ते डॉ. आर्थिका श्रीनिवासन व डॉ. मयुरा धोंडे यांनी 'Demystifying Nerve Conduction Studies' या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. नर्व्ह कंडक्शन स्टडीजची मूलभूत तत्त्वे, मोटर व सेन्सरी नर्व्ह स्टडीज, एफ-वेव्ह, एच-रिफ्लेक्स आणि लेट रिस्पॉन्सेस यांसह विविध बाबींचे प्रात्यक्षिक व चिकित्सकीय महत्त्व त्यांनी स्पष्ट केले.

## बिलोली तालुका कोरडा दुष्काळ जाहीर करा

- हेक्टरी 2 लाख रू द्या व शंभर टक्के विमा मंजुर करा
- शेतकऱ्यांचे मुख्यमंत्र्याकडे निवेदनाद्वारे मागणी

बिलोली ता : (स. गांवकरी)



गेल्या एक महिना भरापासून पावसाने दडी मारल्यामुळे खरीप पिके पूर्णता करपु लागली आसून आता बळीराजा मोठ्या अर्थिक अडचणीत सापडला आसुन

या हवालदिल शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाने बिलोली तालुका कोरडा दुष्काळ जाहीर करून हेक्टरी २ लाख रूपये व शंभर टक्के पिक विमा मंजुर करावा या प्रमुख मागणीसह अन्य मागण्यांचे निवेदन तहसीलदार यांच्या मार्फत मुख्यमंत्र्याकडे पाठवण्यात आले.

खरीप पेरणी हंगामातील मुख्य पिक सायाबिनचा पेरा तालुक्यात सर्वाधिक आसतो.सोयाबीन बियाणे कंपन्यानी यंदा बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात निकृष्ट दर्जाहीन सोयाबीन विक्रीचा अर्थिक फटका सोसत दुबारा तिबारा पेरणी केले. पिकाचे उत्पन्न वाढीच्या अपेक्षे पोटी रासायनिक खत, किटक नाशक फवारणी,कोळपनी -खुरपनी वाढलेल्या मजुरीचा भुर्दंड सोसत पिकांचे वेळोवेळी संगोपन केले. पण ऐन फुल चट्टा बहारात आसताना गेल्या एक महीना भरापासुन वरून राजा दडी मारल्यामुळे सर्वच खरीप पिके करपु लागले आसुन शेतकऱ्यांच्या खरीप पिक उत्पन्नाच्या आशा मावळल्या आसुन आता यापुढे पडलेल्या पावसाचा तिळमात्र उपयोग नसुन या अर्थिक संकटात सापडलेल्या बळीराजाना दिलासा देण्यासाठी शासनाने बिलोली तालुका कोरडा दुष्काळ जाहीर करून हेक्टरी २ लाख रुपये अनुदान द्यावे, शंभर टक्के पिक विमा मंजुर करावा, रब्बी हंगाम पेरणीसाठी हेक्टरी पंचविस हजार रू. द्यावे सन २०२३ते २०२५ चा थक्कीत विम्याचे वाटप करावे, बाभळी बंधारा बँक वाटर नुकसानी थकीत मावेजा वाटप करावा. आदी मागण्यांचे निवेदन आज दि. ८ सप्टेंबर रोजी तहसिलदार बिलोली यांच्या मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे देण्यात आले. यावेळी कॉंग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस केदार पाटील साळुंके शेतकरी जनआंदोलन संघर्ष समितीचे भगवानराव मनुरकर भ्रष्टाचार निर्मुलन संघर्ष समितीचे राजु पाटील शिंपाळकर,शंकरराव मावलगे, सय्यद रियाज, तानाजी पा.चिरलीकर,श्रीपत पा. साळुंके,सुर्यकांत पा. कदम, वसंत पा. बडुरकर, परबत पा. साळुंके,चक्रधर टेकाळे,शेख ईब्राहीम केसराळीकर,संभाजी साखरे, विलास पुयड,मोहन गुलाडे,शेख फेरोजपाशा, माधव साळुंके, संतोश साळुंके,विलास पुयड माधवराव जाधव, दिंगाबर दापके, माधव कबनुरे, शिवाजी साळुंके,एकनाथ हिवराळे,दत्ताहरी ईबितवार यांच्यासह अनेक शेतकऱ्यांच्या सह्यांचे निवेदन देण्यात आले.

## दोन शिक्षक, तीन विद्यार्थी तरीही शाळेला कुलूप'

बरबडा वाडी: (स. गांवकरी)



नायगाव तालुक्यातील येथील जिल्हा परिषद शाळेत दोन शिक्षक व केवळ तीन विद्यार्थी असतानाही शाळेला कुलूप लावण्यात आल्याचे वृत प्रसिद्ध करताच शिक्षण विभागाने या प्रकाराची गंभीर दखल घेतली आहे. संबंधित प्रकरणाची चौकशी केली आहे. करण्यासाठी त्रिसदस्यीय समिती नेमण्यात आली होती शाळेतील शिक्षकांची उपस्थिती, विद्यार्थ्यांची शाळेतील उपस्थिती तसेच शाळेला कुलूप लावण्यामागील नेमके कारण याची समितीमार्फत चौकशी केली आहे. तसेच संबंधित शिक्षकांकडून नियमित अध्यापन केले जाते का, शाळेचे कामकाज नियमानुसार सुरू आहे का आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानीस कोण जबाबदार आहे, याचीही तपासणी केली आहे. गावातील शाळेतील परिस्थितीबाबत पालक व ग्रामस्थांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे, यासाठी शासनाकडून शिक्षकांची नियुक्ती केली जाते. मात्र, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित असतानाही शाळा बंद ठेवण्याचा प्रकार घडत असेल, तर ही बाब शिक्षण व्यवस्थेच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी असल्याची प्रतिक्रिया ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे. वृत्तामुळे प्रशासनाला जाग आली असून आता त्रिसदस्यीय समितीच्या चौकशीकडे सत्य काय बाहेर येणार ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे. समितीच्या अहवालानंतर दोषी आढळणाऱ्यांवर काय होणार , याकडे पालक व ग्रामस्थांचे लक्ष आहे.

## विशेष सखोल पुनरिक्षणाच्या दुसऱ्या टप्प्यात दावे-हरकतींची अचूक पडताळणी करा

**जिल्हाधिकारी राहुल कर्डिले**

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)




विशेष सखोल पुनरिक्षण (SIR) कार्यक्रमांतर्गत दुसऱ्या टप्प्यातील कामास सुरुवात झाली आहे. या टप्प्यात मतदारांकडून प्राप्त होणारे दावे व हरकती यांची काटेकोरपणे पडताळणी करून त्यांचा नियमानुसार तातडीने निपटारा करावा. जिल्ह्यातील एकही पात्र मतदार मतदार यादीपासून वंचित राहणार नाही, तसेच अपात्र अथवा चुकीची नोंद असलेला मतदार यादीत राहणार नाही, यासाठी सर्व मतदार नोंदणी अधिकारी व सहायक मतदार नोंदणी अधिकाऱ्यांनी अचूक व काळजीपूर्वक काम करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात जिल्ह्यातील मतदार नोंदणी अधिकारी व सहायक मतदार नोंदणी अधिकारी यांच्यासाठी विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमाच्या दुसऱ्या टप्प्यातील कामकाजाबाबत प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले मार्गदर्शन करत होते.

यावेळी सहायक जिल्हाधिकारी बी. सरवनन, उपजिल्हा निवडणूक अधिकारी राजकुमार माने, उपजिल्हाधिकारी (रोहयो) हणमंत कोळेकर यांच्यासह सर्व उपविभागीय अधिकारी तथा मतदार नोंदणी अधिकारी यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.

विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत पहिल्या टप्प्याचे काम यशस्वीपणे पूर्ण केल्याबद्दल जिल्हाधिकारी कर्डिले यांनी संबंधित अधिकारी, पर्यवेक्षक व बीएलओ यांचे अभिनंदन केले. जुन्या मतदार यादीतून एखादा पात्र मतदार चुकीने वगळला गेला असल्यास त्या मतदाराकडून फॉर्म नं 6 भरून घेण्यात यावी आणि त्याची योग्य पडताळणी करून नियमानुसार निर्णय घ्यावा. 'एकही पात्र मतदार वंचित राहणार नाही आणि अपात्र मतदार मतदार यादीत राहणार नाही' याची खात्री करण्याचे निर्देश त्यांनी दिले. यावेळी मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी कर्डिले म्हणाले, बीएलओच्या पंचनाम्याच्या आधारे अनेक त्रुटींची दुरुस्ती करणे शक्य आहे. संबंधित मतदारांना व्हॉट्सॲपद्वारे किंवा प्रत्यक्ष नोटीस देऊन आवश्यकतेनुसार सुनावणी घ्यावी. दावे व हरकतींची सुनावणी घेताना प्रत्येक प्रकरणाची काळजीपूर्वक तपासणी करावी. मतदार यादी अधिकाधिक अचूक करण्यासाठी योग्य नियोजन करून निर्धारित वेळेत काम पूर्ण करावे.

फॉर्म क्रमांक 7 व 8 बाबत निर्णय घेताना विशेष दक्षता घेण्याचे निर्देश जिल्हाधिकारी यांनी दिले तसेच सहायक मतदार नोंदणी अधिकारी निहाय सुनावणी बाबतचे अचूक नियोजन करण्यात यावे त्याचप्रमाणे सर्व मतदार नोंदणी अधिकारी यांनी त्यांच्या स्तरावर संबंधित सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी, पर्यवेक्षक व बीएलओ यांना आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात यावे तसेच राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनाही या प्रक्रियेबाबत अवगत करावे, असे त्यांनी सांगितले. पुनरिक्षणाच्या प्रक्रियेत कोणतीही अनियमितता अथवा गंभीर स्वरूपाची चूक आढळल्यास नियमानुसार कठोर कारवाई करून आवश्यकतेनुसार एफआयआर दाखल करावा, असेही त्यांनी स्पष्ट केले. नवीन मतदार नोंदणीवरही विशेष लक्ष केंद्रित करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी . कर्डिले यांनी दिल्या. मतदार नोंदणीपासून वंचित राहिलेल्या पात्र नागरिकांची माहिती घेऊन त्यांचेकडून फॉर्म नं. 6 चे अर्ज भरून घ्यावेत. मतदार यादी अधिकाधिक अचूक व अद्ययावत करण्याच्या दृष्टीने क्षेत्रीय पातळीवर प्रभावी नियोजन करून कामाची गती वाढवावी आणि सदरच्या कामकाजामध्ये अचुकता व पारदर्शकता ठेवावी, असे त्यांनी सांगितले.

# थोडक्यात पण महत्वाचे

## शिक्षणासाठीच्या संघर्षाची संवेदनशील गोष्ट दाखवणारा "भाटा"




पुणे (स. गांवकरी) : आजच्या कृत्रिम बुद्धिमत्तेच्या काळातही काही समाज घटक शिक्षणापासून वंचित आहेत. याच वंचित घटकापैकी एक असलेल्या बेलदार समाजातील एक संवेदनशील कहाणी आता मोठ्या पडद्यावर येत आहे. बेलदार समाजाचा इतिहास उलगडत शिक्षणासाठीच्या संघर्षाची गोष्ट भाटा या चित्रपटातून प्रेक्षकांसमोर येणार असून, उत्कृष्ट स्टारकास्ट असलेला हा चित्रपट ११ सप्टेंबर रोजी सर्वत्र प्रदर्शित होत आहे. व्ही. डि. एंटरटेनमेंट आणि मोरया उद्योग समूह यांनी या चित्रपटाची प्रस्तुती केली असून अरायव्हल स्टुडिओ प्रा. लि. या निर्मिती संस्थेने "भाटा" या चित्रपटाची निर्मिती केली आहे. सुनील आबा जाधव आणि विजय चंद्रकांत चव्हाण हे या चित्रपटाचे निर्माते आहेत. रिजवान शेख, मितेश पराडकर, सुनील सुनील कातकर हे या चित्रपटाचे सहनिर्माते आहेत. भरतराज नारायण यादव यांनी चित्रपटाचे दिग्दर्शन केले आहे. या चित्रपटाची कथा विजय चंद्रकांत चव्हाण यांची आहे, तर पटकथा आणि संवाद शरद कारंडे यांचे आहेत. श्रेयस आंगणे यांनी चित्रपटाची गाणी लिहिली असून संगीतही त्यांचेच आहे तर छायाचित्रण हरेश सावंत यांचे आहे. .सुप्रसिद्ध ज्येष्ठ अभिनेते मोहन जोशी, अभिनेते अरुण नलावडे, प्रशांत मोहिते अभिनेत्री रुपाली जाधव, विजय कदम, अनिल नगरकर, लक्ष्मण दावभट, ऋषभ जाधव, प्रेमा किरण बालकलाकार तनिष्का जाधव यांचा दमदार अभिनय आपल्याला पहायला मिळणार आहे.

## ध्वनिप्रदूषणमुक्त उत्सवासाठी ‘सोलापूर पॅटर्न’चा पुण्यात संवाद

पुणे (स. गांवकरी) : जागरूक पुणेकर नागरिक समितीच्या वतीने ध्वनिप्रदूषणमुक्त उत्सवाची संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी, सोलापुरात राबविण्यात आलेल्या उपक्रमाची माहिती पुणेकरांना देण्यासाठी विशेष संवादाचे आयोजन करण्यात आले आहे. ‘उत्सव हवेत; कर्णकर्कश आवाज नको! ध्वनिप्रदूषणमुक्त उत्सवाचा सोलापूर पॅटर्न’ या विषयावर हा संवाद होणार आहे. यामध्ये ज्येष्ठ पत्रकार तथा DJ मुक्त सोलापूर मोहिमेचे मुख्य प्रवर्तक सिद्धाराम पाटील यांची यावेळी विशेष मुलाखत होणार आहे. सोलापुरात संवादातून बदल घडवून आणण्यासाठी राबविण्यात आलेल्या प्रयत्नांचा अनुभव ते यावेळी मांडणार आहेत. हा कार्यक्रम गुरुवार, १० सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता पुण्यातील केसरी वाडा (लोकमान्य हॉल), नारायण पेठ येथे होणार आहे. सोलापुरात राबविलेला उपक्रम पुण्यातही कसा राबविता येईल, याबाबत यावेळी चर्चा होणार आहे. ‘जे सोलापुरात झाले, ते पुण्यातही होणारच!’ असा संदेश देत संघर्षाऐवजी संवादातून ध्वनिप्रदूषणमुक्त उत्सवाची दिशा ठरविण्याचे आवाहन करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे निमंत्रक म्हणून सौरभ वीरकर, निलेश धायरकर आणि अशोक तिडके असून . पुणे इकॉलॉजिकल फाउंडेशन, सिद्धेश्वर मंदिर ट्रस्ट, लोकशाही जागर मंच, राष्ट्र प्रथम फाउंडेशन, सुराज्य स्वर्गीण प्रकल्प आणि समता प्रतिष्ठान (संदीप मोरे) हे या उपक्रमाचे सहभागी आहेत.

## मोठ्या टॉक्सिक गोईटरमुळे श्वसनमार्गाला धोका



पुणे (स. गांवकरी) : मोठ्या आकाराच्या टॉक्सिक मल्टिनोड्युलर गोईटर आणि दीर्घकाळापासून असलेल्या हायपरथायरॉईडीझममुळे त्रस्त असलेल्या ५४ वर्षीय महिलेवर मेडिकोव्हर हॉस्पिटल, भोसरी, पुणे येथे टोटल थायरॉइडेक्टॉमी शस्त्रक्रिया यशस्वीपणे करण्यात आली. थायरॉईड ग्रंथीच्या वाढलेल्या आकारामुळे रुग्णेला श्रम करताना श्वास घेण्यास त्रास तसेच आवाजात बदल जाणवत होता. सुनीता फाटंगरे या रुग्णेला दीर्घकाळापासून हायपरथायरॉईडीझम असून त्यांच्यावर अँटी-थायरॉईड औषधोपचार सुरू होते. मात्र, कालांतराने थायरॉईड ग्रंथीचा आकार वाढून मोठा मल्टिनोड्युलर गोईटर तयार झाला. त्यासोबत श्वास घेण्यास त्रास आणि आवाजात बदल अशी लक्षणे दिसू लागल्याने मेडिकोव्हर हॉस्पिटलमधील डॉक्टरांनी शस्त्रक्रियेचा निर्णय घेतला. डॉ. आशिष शहुराव बांगर, कन्सल्टंट – सर्जिकल ऑन्कोलॉजी, यांच्या नेतृत्वाखाली आणि डॉ. शिरीष शेळके, कन्सल्टंट – ईएनटी यांच्या सहकार्याने ही गुंतागुंतीची केस हाताळण्यात आली. एंडोक्रायनॉलॉजी, क्रिटिकल केअर आणि अँनेस्थेशिया विभागाच्या टीमनेही उपचार प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावली.



## भिवंडीत संत सेना महाराज जयंती निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन

भिवंडी (स. गांवकरी) : नाभिक समाज उन्नती मंडळ भिवंडीच्या वतीने मंगळवारी संत सेना महाराज जयंती निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन कोंबडपाड्यातील गाजेंगी हॉलसमोरील पार्वती मंगल कार्यालयात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.यामध्ये सत्यनारायणाची महापूजा,भक्त गीते,सत्कार समारंभ ,विद्यार्थ्यांचा गुणगौरव आणि वह्या वाटप अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यासह भक्तांसाठी रात्री महाप्रसाद (भंडारा) ठेवण्यात आला होता.यावेळी नाभिक समाज अध्यक्ष मनोहर निकम, उपाध्यक्ष दीपक वाघ, महिला अध्यक्ष वृषाली गायकवाड, उपाध्यक्ष छाया अहिरे, सह, महानगरपालिका स्थायी सभापती अँड वैभव भोईर, नगरसेविका रोमा आळशी, महाराष्ट्र राज्य तालुका अध्यक्ष हरिश्चंद्र लाड,ठाणे जिल्हा नाभिक समाज अध्यक्ष पप्पू खंडागळे,आदि मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये संत सेना महाराज जयंती संपन्न झाली.

## पावसातील खंड काळात पिकांचे व्यवस्थापन करून उत्पादन क्षमता टिकवावी

बिलोली (स. गांवकरी) : बिलोली तालुक्यात खरीप हंगामातील काही पिकांना सध्या पावसाच्या खंडामुळे पाण्याचा ताण जाणवत आहे. विशेषतः सोयाबीन, तूर व कापूस पिकांच्या वाढीच्या तसेच फुलोरा, शेंगा व बोंडधारणेच्या अवस्थेत जमिनीतील ओलावा कमी झाल्यास उत्पादनावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी घाबरून न जाता पिकांची अवस्था व जमिनीतील उपलब्ध ओलावा लक्षात घेऊन योग्य उपाययोजना कराव्यात, असे आवाहन तालुका कृषी विभाग, बिलोलीच्या वतीने करण्यात आले आहे. उपलब्ध विहीर, बोअरवेल अथवा इतर सिंचन स्रोतांतील पाण्याचा काटकसरीने वापर करून फुलोरा, शेंगा भरणे व बोंडधारणा यांसारख्या संवेदनशील अवस्थेतील पिकांना प्राधान्याने संरक्षित सिंचन द्यावे. तसेच पिकाची अवस्था व जमिनीची परिस्थिती लक्षात घेऊन हलकी कोळपणी किंवा आंतरमशागत करून जमिनीतील भेगा बुजवाव्यात. यामुळे बाष्पीभवन कमी होऊन जमिनीतील उपलब्ध ओलावा टिकून राहण्यास मदत होते.

# बांधणेपाडा अंगणवाडी केंद्रात पोषण अभियानाचा उत्साहात शुभारंभ

**पोषण दिंडी, पोषण प्रतिज्ञा व बालस्नेही गाव शपथ; शेवगा रोपाचे वृक्षारोपण**

ठाणे : (स. गांवकरी)



बालक, किशोरी, गर्भवती महिला आणि स्तनदा मातांच्या आरोग्य व पोषणाचा दर्जा उंचावण्यासाठी जनजागृती करण्याच्या उद्देशाने अंगणवाडी केंद्र, बांधणेपाडा येथे आज, दि. ९ सप्टेंबर २०२६ रोजी पोषण अभियान आरंभ उद्घाटन सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी विविध पोषणविषयक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या निमित्ताने पोषण दिंडीचे आयोजन करण्यात आले. या दिंडीमध्ये अंगणवाडीतील लाभार्थी बालके, माता, महिला तसेच ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. पोषणाचे महत्त्व, संतुलित आहार, बालकांचे आरोग्य आणि मातांच्या आरोग्याबाबत जनजागृती करणारे संदेश देत पोषण दिंडी काढण्यात आली. यावेळी उपस्थितांनी पोषणाची प्रतिज्ञा घेतली. बालकांना सकस व पौष्टिक आहार देणे, त्यांच्या आरोग्याची योग्य काळजी घेणे, स्वच्छता व आरोग्यविषयक सवयी अंगीकारणे तसेच कुपोषण निर्मूलनासाठी सामूहिक प्रयत्न करण्याचा संकल्प करण्यात आला. तसेच गावातील प्रत्येक बालकाला सुरक्षित, निरोगी आणि आनंदी वातावरण मिळावे, बालकांच्या हक्कांचे संरक्षण व्हावे आणि गाव बालस्नेही करण्यासाठी सर्वांनी योगदान द्यावे, यासाठी ‘बालस्नेही गाव शपथ’ घेण्यात आली. पोषण आणि पर्यावरण यांचा समन्वय साधत यावेळी शेवगा रोपाचे वृक्षारोपण करण्यात आले. शेवग्याच्या पानांमध्ये विविध पोषक घटक उपलब्ध असल्याने पोषणाच्या दृष्टीने त्याचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. अंगणवाडी परिसरात पोषणविषयक उपयुक्त वनस्पतींची लागवड करण्याच्या माध्यमातून पोषणाबाबत जनजागृती करण्याचा संदेश यावेळी देण्यात आला. कार्यक्रमादरम्यान मातृत्व वंदन योजना तसेच मातांच्या आरोग्याशी संबंधित विविध शासकीय योजनांची माहिती उपस्थित माता व महिलांना देण्यात आली. पात्र लाभार्थींनी शासनाच्या योजनांचा लाभ घ्यावा, तसेच गर्भवती महिला व स्तनदा मातांनी आपल्या आरोग्याबरोबरच बालकाच्या आरोग्य व पोषणाकडे विशेष लक्ष द्यावे, याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

अंगणवाडी केंद्राच्या माध्यमातून बालकांच्या आरोग्य, पोषण आणि पूर्वप्राथमिक शिक्षणासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत असून, पालकांनी अंगणवाडी सेविकांशी समन्वय साधून बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन करण्यात आले.

बांधणेपाडा येथे आयोजित पोषण दिंडी आणि विविध उपक्रमांच्या माध्यमातून पोषणाचा संदेश घराघरापर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. अंगणवाडीतील बालकांच्या आरोग्य व पोषणासाठी पालकांनी नियमितपणे अंगणवाडीशी संपर्क ठेवावा आणि उपलब्ध शासकीय सेवांचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले. या कार्यक्रमास जिल्हा कार्यक्रम अधिकारी शोभा शेलार, बाल विकास प्रकल्प अधिकारी धनश्री साळुंखे आरोग्य अधिकारी,पर्यवेक्षिका उषा लांडगे व सर्व पर्यवेक्षिका, मदतनीस,प्रथम संस्थेचे समन्वय, पालक, माता, ग्रामस्थ, महिला आणि अंगणवाडी केंद्र, बांधणेपाडा येथील बालकांची उपस्थिती होती. पोषण अभियानाच्या माध्यमातून सुदृढ बालक, निरोगी माता आणि पोषणक्षम कुटुंब निर्माण करण्यासाठी महिला व बाल विकास विभागाच्या माध्यमातून विविध जनजागृतीपर उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहेत.

### पोषण अभियानातून लोकसहभागाला चालना

पोषण अभियान हे केवळ शासकीय यंत्रणेपुरते मर्यादित न राहता त्यामध्ये माता, पालक, महिला, ग्रामस्थ आणि स्थानिक समुदायाचा सक्रिय सहभाग आवश्यक आहे. बालकांचे आरोग्य आणि पोषण सुधारण्यासाठी कुटुंबाच्या पातळीवर सकस आहार, स्वच्छता, आरोग्य तपासणी आणि योग्य आरोग्यविषयक सवयी यांना प्राधान्य देणे गरजेचे आहे.

# अर्धापूर तालुक्यावर दुष्काळ सदृश्य संकट

अर्धापूर : (स. गांवकरी)



मागील एक महिन्यापासून पावसाने दडी मारल्याने प्रचंड उन्हाचा तडाखा बसल्यामुळे शेतकऱ्यांच्या केळीच्या बागा अक्षरशः पिकून गेल्या. जून महिन्यात तीन हजार रुपये प्रति क्विंटल असलेला केळीचा भाव आता अवघ्या पाचशे रुपये प्रति क्विंटल एवढा झाला असून केळी व्यापारी केळीचे झाड घेण्यास टाळाटाळ करीत आहेत.

उन्हाची तीव्रता इतकी प्रचंड आहे की सोयाबीनच्या शेंगा गळून पडत आहेत व झाडे सुकत आहेत. आधीच आर्थिक संकटात सापडलेला शेतकरी कमालीचा हैराण झाला असून हातात तोंडाशी आलेला घास पावसाअभावी जातो की काय अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

गेल्या एक महिन्यापासून पावसाने उघडीत दिल्यामुळे व उन्हाची तीव्रता वाढल्यामुळे शेतीचे प्रचंड प्रमाणात नुकसान होत असून अर्धापुर तालुका जवळजवळ दुष्काळग्रस्त झालेला आहे केळी पिकाचे अंदाजे पाचशे कोटी रुपयांचे नुकसान झालेले असून याबाबत शासनाने तलाठ्या मार्फत पंचनामे करून नुकसान भरपाई देण्यासंदर्भात शेतकऱ्यांनी अर्धापूर चे तहसीलदार यांना निवेदन देऊन तात्काळ मदत देण्यासंदर्भात विनंती केली आहे.

# इंधन व्यवस्थेसाठी शासनामार्फत प्राप्त ३४ पेट्रोल कार्डचे वितरण

**मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांच्या हस्ते पेट्रोल कार्डचे वाटप; ग्रामीण भागातील रुग्णवाहिका सेवा अधिक सक्षम होण्यास मदत**

ठाणे : (स. गांवकरी)



ग्रामीण भागातील नागरिकांना तातडीच्या व अत्यावश्यक आरोग्य सेवा वेळेत उपलब्ध करून देण्यासाठी रुग्णवाहिका सेवा अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावते. रुग्णवाहिकांसाठी इंधनाची उपलब्धता सातत्याने राहावी आणि इंधन भरण्याची प्रक्रिया अधिक सुलभ व्हावी, यासाठी शासनामार्फत प्राप्त झालेल्या पेट्रोल कार्डचे वितरण जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांच्या हस्ते आज, दि. ०८ सप्टेंबर रोजी जिल्हा परिषदेच्या सभागृहात करण्यात आले. यावेळी प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या रुग्णवाहिकांसाठी तसेच जिल्हा मुख्यालयातील रुग्णवाहिकेसाठी असे एकूण ३४ पेट्रोल कार्डचे वितरण करण्यात आले. या पेट्रोल कार्डच्या माध्यमातून संबंधित रुग्णवाहिकांना एचपी पेट्रोल पंपावर जाऊन कार्डचा वापर करून आवश्यक इंधन भरता येणार आहे. त्यामुळे रुग्णवाहिका सेवेसाठी इंधन उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया अधिक सुलभ होण्यास मदत होणार असून, आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांना वेळेत आवश्यक त्या आरोग्य संस्थेत पोहोचविणे अधिक सुलभ होणार आहे. रुग्णवाहिकांसाठी वितरित करण्यात आलेल्या पेट्रोल कार्डच्या खात्यामध्ये दररोज नियोजित रक्कम जमा करण्यात येणार आहे. संबंधित रुग्णवाहिका चालक अथवा अधिकृत व्यक्ती एचपी पेट्रोल पंपावर जाऊन पेट्रोल कार्डचा वापर करून रुग्णवाहिकेसाठी आवश्यक इंधन भरू शकणार आहे.

या व्यवस्थेमुळे रुग्णवाहिकांना आवश्यकतेनुसार इंधन उपलब्ध होण्यास मदत होणार असून, इंधन व्यवस्थापनातील सुलभता आणि सातत्य राखण्यासही मदत होणार आहे. परिणामी रुग्णवाहिका सेवा अधिक कार्यक्षमपणे आणि अखंडितपणे उपलब्ध करून देणे शक्य होणार आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील आरोग्य सेवा अधिक सक्षम, सुलभ आणि नागरिकाभिमुख करण्यासाठी विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. ग्रामीण भागातील नागरिकांना वेळेत उपचार मिळावेत, गंभीर रुग्णांना आवश्यकतेनुसार पुढील उपचारासाठी संदर्भित आरोग्य संस्थेत तातडीने पोहोचविता यावे आणि आपत्कालीन परिस्थितीत रुग्णवाहिका सेवा प्रभावीपणे उपलब्ध व्हावी, यासाठी रुग्णवाहिकांची कार्यक्षमता महत्त्वाची आहे.

शासनामार्फत उपलब्ध करून देण्यात आलेल्या पेट्रोल कार्डचे वितरण करण्यात आल्यामुळे रुग्णवाहिकांच्या इंधन व्यवस्थेला अधिक सुलभता प्राप्त होणार आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रांमधून रुग्णांना ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये तसेच आवश्यकतेनुसार इतर शासकीय आरोग्य संस्थांमध्ये वेळेत स्थलांतरित करण्यासाठी या सुविधेचा उपयोग होणार आहे.

# प्रियदर्शनी ग्रुप ऑफ स्कूल्सतर्फे ‘द्रोणाचार्य दिन २०२६’ उत्साहात

**शिक्षकांच्या योगदानाला अभिवादन; सांस्कृतिक वारशाचे दर्शन आणि गुणवंत शिक्षकांचा गौरव**

पुणे : (स. गांवकरी)





प्रियदर्शनी ग्रुप ऑफ स्कूल्सचा वार्षिक शिक्षक दिन सोहळा ‘द्रोणाचार्य दिन २०२६’ चिखली येथील टाऊन हॉलमध्ये उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याबरोबरच त्यांच्या शैक्षणिक आणि सामाजिक योगदानाचा गौरव या कार्यक्रमातून करण्यात आला. प्रियदर्शनी परिवारातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि मान्यवरांची यावेळी उपस्थिती होती.

सोहळ्याचे विशेष आकर्षण ठरले ते ‘अनुभव’ या विशेष संग्रहाचे प्रकाशन. प्रियदर्शनीच्या विविध शाखांतील शिक्षकांनी अनुभवलेल्या वास्तव जीवनातील घटना, आठवणी, भावना आणि त्यांच्या व्यावसायिक प्रवासातील प्रेरणादायी प्रसंग या संग्रहातून मांडण्यात आले आहेत. या माध्यमातून शिक्षकांच्या कार्यामागील मानवी आणि भावनिक पैलूंना उजाळा देण्यात आला.

माजी विद्यार्थ्यांनी व्हिडिओ संदेशांच्या माध्यमातून आपल्या शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. विद्यार्थ्यांच्या आयुष्याला योग्य दिशा देताना शिक्षकांनी बजावलेल्या महत्त्वपूर्ण भूमिकेचे स्मरण या संदेशांतून करण्यात आले. संस्थेचे संस्थापक कै. श्री. इंद्रमन सिंग यांच्या दूरदृष्टीला यावेळी अभिवादन करण्यात आले. सर्वांसाठी सुलभ, मूल्याधिष्ठित शिक्षण आणि युवक सक्षमीकरणाचे त्यांनी पाहिलेले स्वप्न आजही प्रियदर्शनीच्या शैक्षणिक वाटचालीचा आधार असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

प्रियदर्शनी परिवारातील लाडक्या शिक्षिका कै. सुश्री अविता सिल्वेरा यांच्या स्मरणार्थ उपस्थितांनी दोन मिनिटे मौन पाळून श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी बोलताना डॉ. जितेंद्र सिंग, व्यवस्थापकीय विश्वस्त, प्रियदर्शनी ग्रुप ऑफ स्कूल्स म्हणाले, “प्रत्येक शैक्षणिक संस्थेच्या केंद्रस्थानी शिक्षक असतात. त्यांचा प्रभाव केवळ अभ्यासक्रम आणि शैक्षणिक ज्ञानापुरता मर्यादित नसतो. ते विद्यार्थ्यांना प्रेरणा देतात, योग्य दिशा दाखवतात आणि आयुष्यभर उपयोगी पडणारी मूल्ये व आत्मविश्वास निर्माण करतात. द्रोणाचार्य दिनाच्या माध्यमातून आमच्या शिक्षकांच्या योगदानाचा गौरव करण्याची आणि शाळेसाठी दररोज देत असलेल्या समर्पित सेवेसाठी कृतज्ञता व्यक्त करण्याची संधी मिळते.” कार्यक्रमात संस्थेच्या नेतृत्वाचाही गौरव करण्यात आला. विश्वस्त आणि प्राचार्यांचा सत्कार करण्यात आला, तसेच ‘हेल्पिंग हँड पुरस्कार’ प्रदान करण्यात आला. ‘फोक हेरिटेज ऑफ इंडिया’ या संकल्पनेवर आधारित सांस्कृतिक सादरीकरण हा कार्यक्रमाचा आणखी एक प्रमुख आकर्षण ठरला. शिक्षकांनी भारतातील विविध प्रादेशिक परंपरा, लोककला आणि सांस्कृतिक वैविध्याचे प्रभावी दर्शन घडविले. या सादरीकरणात सहभागी झालेल्या शिक्षकांना ‘आचार्य नृत्य पुरस्कार’ देऊन गौरविण्यात आले.

# सर्वे नंबर १८० नंतर आता सर्वे नंबर १३९ चा वाद ऐरणीवर!

वसमत : (स. गांवकरी)

- संकटमोचन हनुमान मंदिर परिसरातील कठीतअतिक्रमण प्रकरण
- नगर विकास विभागाच्या पत्रानंतर वसमत मुख्याधिकारीची नोटीस

वसमत शहरातील सर्वे नंबर १८० प्रकरणानंतर आता सर्वे नंबर १३९ मध्ये संकट मोचन हनुमान मंदिर परिसरातील मोकळे जागेचा वाद चांगलाच ऐरणीवर आला आहे. संकटमोचक हनुमान मंदिराच्या मोकळ्या जागेबाबत बनावट कागदपत्रे तयार करून नामांतर केल्याचा आरोप करत अॅड. शिवाजी नारायण अडकीणे यांनी थेट जिल्हाधिकारी कार्यालयाकडे तक्रार दाखल केली होती. ऑगस्ट 2026 मध्ये जिल्हाधिकारी कार्यालयाचा नगर विकास विभागाने या प्रकरणाची दखल घेतल्याने प्रशासकीय हालचालींना वेग आला आहे. नगर विकास विभागाच्या निर्देशानंतर वसमत नगर परिषदच्या मुख्याधिकाऱ्यांनी संबंधित व्यक्तीस पत्र देत कथित अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम बाबत कारवाईचा इशारा दिल्याने प्रकरण पुन्हा ऐरणीवर आले आहे. या प्रकरणासंदर्भात संघर्ष समितीप्रमुख अॅड. शिवाजी नारायणराव अडकिणे यांनी संबंधित प्रशासनाकडे तक्रार सादर केली होती. तक्रारीत संकटमोचन हनुमान मंदिर परिसरातील मोकळ्या जागेच्या नामांतर प्रक्रियेबाबत तसेच संबंधित जागेवरील बांधकामाबाबत गंभीर प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. उपलब्ध पत्रव्यवहारानुसार, तक्रारीची दखल घेत जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नगर विकास विभागाने 18 जून 2026 रोजी मुख्याधिकारी, नगर परिषद वसमत यांना पत्र पाठविले.

# मुंबईच्या भूमीत घुमला पारनेरच्या मातीचा आवाज..!

अहिल्यानगर : (स. गांवकरी)



गोविदा रे.. गोपाला.. हा गोपाळकाला आणि दहीहंडी एकजुटीचा संदेश देणारा उत्सव आहे. या ठिकाणी एकत्र आलेली पारनेरकरांची मोठी उपस्थिती त्यांच्या सामाजिक व सांस्कृतिक एकतेची साक्ष आहे. हीच एकजूट भविष्यात समाजहिताच्या मोठ्या कामांसाठी उपयोगी पडावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. राजकीय झेंडे बाजूला ठेवून पारनेरकरांनी एकत्र यावे : संजय आहेर पारनेरकर रहिवासी संघ दहीहंडी उत्सव समितीचे सचिव संजय आहेर यांनी यावेळी पारनेरकरांच्या एकजुटीचा मुद्दा ठळकपणे मांडला. “पारनेरचे कामदार आमदार काशिनाथ दाते सर यांनी गेल्यावर्षी दहीहंडी उत्सवात दिलेला मौलिक सल्ला आम्ही मनापासून स्वीकारला. तालुक्याची एकी दाखविण्यासाठी सर्वांनी राजकीय झेंडे बाजूला ठेवून एकाच दहीहंडीच्या माध्यमातून एकत्र यावे, यासाठी आम्ही प्रयत्न केले. कामोठेला ‘मिनी पारनेर’ म्हणून ओळखले जाते. त्यामुळे पारनेरकरांची मजबूत संघटना उभी करण्याची ही संधी आम्हाला महत्त्वाची वाटत होती,” असे आहेर यांनी सांगितले.

# मदतीचा हात नव्हे... रोजगाराचे बळ..!

- वडझिरेतील गरजू महिलांना शिलाई मशीन, आटा चक्कीचे वाटप
- श्रीराजहंस फाउंडेशनचा स्तुत्य उपक्रम

अहिल्यानगर : (स. गांवकरी)



गरजू महिलांना केवळ आर्थिक मदत देण्याऐवजी त्यांच्या हाताला रोजगाराचे साधन देऊन स्वावलंबनाची नवी वाट दाखविण्याचा आदर्श उपक्रम श्रीराजहंस फाउंडेशनने राबविला. पारनेर तालुक्यातील वडझिरे येथे फाउंडेशनच्या वतीने गरजू महिलांना शिलाई मशीन व आटा चक्कीचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे लाभार्थी महिलांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य फुलले.

ग्रामपंचायत कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते लाभार्थींना शिलाई मशीन व आटा चक्कीचे वितरण करण्यात आले. या माध्यमातून महिलांना घरबसल्या रोजगाराची संधी उपलब्ध होऊन त्यांच्या कुटुंबाच्या आर्थिक उत्पन्नाला हातभार लागणार आहे. कार्यक्रमास श्रीराजहंस फाउंडेशनचे संस्थापक महेंद्र लोखंडे, संचालिका वैशाली लोखंडे, जिल्हा व्यवस्थापक सविता आढाव, पारनेर तालुका व्यवस्थापक रेश्मा मण्यार आढाव, पत्रकार भगवान गायकवाड यांच्यासह ग्रामस्थ व लाभार्थी महिला उपस्थित होत्या. यावेळी सविता आढाव यांनी फाउंडेशनच्या सामाजिक कार्याची माहिती देताना सांगितले की, समाजातील वंचित व गरजू घटकांना मदतीचा हात देण्यासोबतच महिलांना स्वावलंबी करण्यासाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यावर संस्थेचा विशेष भर आहे. विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक मार्गदर्शन, आरोग्य शिबिरे, जनजागृती मोहिमा, संस्कृती व परंपरांचे संवर्धन यांसह तरुणांसाठी क्रीडा संधी आणि शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शन व सहाय्याचे उपक्रमही राबविले जात आहेत. ‘सशक्त नागरिक • प्रगत समाज • उज्ज्वल भविष्य’ या ध्येयाने आणि ‘शिक्षण, आरोग्य, संस्कार आणि संधी - सर्वांसाठी’ या ब्रीदवाक्याने श्रीराजहंस फाउंडेशनचे सामाजिक कार्य सुरू आहे. समाजातील प्रत्येक घटकाने या कार्यात सहभागी होऊन स्वयंसेवक म्हणून योगदान द्यावे तसेच गरजू विद्यार्थी व वंचित घटकांना सहकार्य करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

# युवक काँग्रेसने उडविले कागदी विमाने

- पोकळ आश्वासनांवर संताप
- सेवा तातडीने सुरू करण्याची मागणी




सोलापूर : (स. गांवकरी)

सोलापूरची विमानसेवा पुन्हा बंद झाल्याच्या निषेधार्थ शहर युवक काँग्रेसच्या वतीने बुधवारी विमानतळाच्या प्रवेशद्वारासमोर कागदी विमाने उडवत केंद्र सरकारविरोधात जोरदार निदर्शने करण्यात आली. यावेळी आंदोलकांनी विमानसेवा तातडीने पूर्ववत करण्याची मागणी केली. विमानसेवेच्या प्रश्नाकडे सरकारकडून वारंवार दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी प्रतीकात्मक विमानांवर पंतप्रधान, पालकमंत्री, केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्री आणि राज्यमंत्र्यांचे फोटो लावले होते. 'विमानसेवा सुरू करा', 'केंद्र सरकार मुर्दाबाद', 'पालकमंत्री मुर्दाबाद' अशा घोषणांनी विमानतळ परिसर दणाणून गेला. यावेळी गणेश डोंगरे यांनी सरकारवर निशाणा साधला. "निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सोलापूर विमानतळाचे मोठ्या थाटात उद्घाटन करण्यात आले. विमानसेवा सुरू करण्याच्या आश्वासनांवरून जनतेची दिशाभूल करण्यात आली. मात्र, सेवा वारंवार सुरू-बंद होत असून आता ती पूर्णपणे ठप्प झाली आहे," असा आरोप शहर युवक काँग्रेस अध्यक्ष डोंगरे यांनी केला. विमानसेवेसाठी सिद्धेश्वर साखर कारखान्याची चिमणी पाडण्यात आली आणि अनेक कुटुंबांवर परिणाम झाला. एवढ्या मोठ्या प्रक्रियेनंतरही सोलापूरला स्थिर आणि नियमित विमानसेवा मिळत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी असल्याचे डोंगरे यांनी सांगितले. उद्योग, व्यापार, पर्यटन आणि रोजगाराच्या दृष्टीने विमानसेवा महत्त्वाची असून सरकारने केवळ उद्घाटन आणि आश्वासनांपुरते मर्यादित न राहता कायमस्वरूपी सेवा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी त्यांनी केली. आंदोलनात सचिन पवार, विनोद पाटील, सुशिलकुमार म्हेत्रे, योगेश रणधीरे, विवेक इंगळे, अब्दुल हाफीज मुल्ला, प्रतीक शिंगे, चंद्रकांत नाईक, यासीन शेख, सोपान मिसाळ, अमोल माशाळे यांच्यासह युवक काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



ठाणे, दि. ९ सप्टेंबर : मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार ठाणे शहरातील पर्यावरण संवर्धन, वायू प्रदूषण नियंत्रण, स्वच्छता व्यवस्थापन आणि महापालिकेच्या महसुलात वाढ करण्यासाठी ठाणे महापालिकेने व्यापक कृती आराखडा तयार केला आहे. या आराखड्याच्या प्रभावी व कालबद्ध अंमलबजावणीसाठी महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी नागरी संशोधन केंद्र येथे सर्व विभागप्रमुखांची आढावा बैठक घेतली. यावेळी अतिरिक्त आयुक्त-२ प्रशांत रोडे, उपायुक्त, सहायक आयुक्त तसेच अभियंते उपस्थित होते.

## थोडक्यात बातम्या...



### ठाण्यात लघु रुद्राभिषेक सोहळा उत्साहात!

- नानजीभाई खीमजीभाई ठक्कर यांची प्रमुख उपस्थिती!

ठाणे (स. गांवकरी) : श्रावण महिन्याच्या पावन पर्वानिमित्त श्री कच्छ वागड लुहाणा महिला मंडळाच्या वतीने ठाणे येथील जय भगवान सभागृहात ८ सप्टेंबर रोजी लघु रुद्राभिषेक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. महाजनचे अध्यक्ष नानजीभाई खीमजीभाई ठक्कर यांच्या शुभहस्ते कार्यक्रमाचा शुभारंभ झाला. यावेळी महाजनचे मानद मंत्री नटवरलाल ठक्कर, रमेश पुजारा, राजेंद्र पांडे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. धार्मिक विधी कथाकार जिग्नेशभाई जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. यावेळी बोलताना नानजीभाई ठक्कर यांनी समाजातील शिक्षणाचे वाढते प्रमाण आणि युवक-युवतींची विविध क्षेत्रांतील उल्लेखनीय प्रगती याबाबत समाधान व्यक्त केले. डॉक्टर, सनदी लेखापाल, अभियंते तसेच विविध उच्च पदांवर कार्यरत असलेले युवक-युवती समाज व देशाच्या सेवेत योगदान देत आहेत. महाजनच्या वतीने गेल्या ५० वर्षांपासून विद्यार्थ्यांना पारितोषिके, शैक्षणिक मार्गदर्शन तसेच गरजू व्यक्तींना आर्थिक मदत दिली जात असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या आयोजनात कल्पना महादेव ठक्कर, सोनल मजेठिया, गीता राजेश ठक्कर, कल्पना जगदीश ठक्कर, तरुणा प्रवीण ठक्कर, मीनाबेन विनोद ठक्कर आणि कलावती ठक्कर यांनी विशेष योगदान दिले. मोठ्या संख्येने महिलांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. जिग्नेशभाई जोशी यांनी सनातन धर्माच्या परंपरा व आचार-विचारांचे महत्त्व सांगत सुख, शांती आणि समृद्धीसाठी मार्गदर्शन केले. धार्मिक वातावरणात झालेल्या या सोहळ्यानंतर उपस्थितांसाठी प्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

### सापुताऱ्यातील झिपलाइन ॲक्टिव्हिटीवर गंभीर आरोप

डांग, गुजरात (स. गांवकरी) : डांग जिल्ह्यातील प्रसिद्ध पर्यटनस्थळ सापुतारा येथे तलावाजवळ सुरू असलेल्या झिपलाइन ॲक्टिव्हिटीवरून वाद निर्माण झाला आहे. या प्रकल्पामध्ये अनियमितता, पारदर्शकतेचा अभाव तसेच पर्यटकांच्या सुरक्षेच्या नियमांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप स्थानिक अर्जदार मनीषभाई मारकणा यांनी केला आहे. यासंदर्भात त्यांनी डांग जिल्हाधिकाऱ्यांना सविस्तर निवेदन देऊन झिपलाइनची सद्यस्थितीतील कार्यवाही तातडीने थांबवावी आणि संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करावी, अशी मागणी केली आहे. निवेदनातील आरोपानुसार, सापुतारा येथे यापूर्वी पायलट प्रोजेक्ट यशस्वी झाला असतानाही, सार्वजनिक स्पर्धात्मक ई-टेंडर प्रक्रिया न राबवता किंवा वर्तमानपत्रांमध्ये जाहिरात न देता एका विशिष्ट खासगी एजन्सीला थेट काम देण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. RTI अंतर्गत माहिती मागितल्यानंतरही संबंधित एजन्सीचा पूर्वानुभव आणि तांत्रिक पात्रता दर्शविणारी आवश्यक प्रमाणपत्रे उपलब्ध करून देण्यात आली नसल्याचा आरोप अर्जदाराने केला आहे. त्यामुळे संबंधित कार्यालय आणि अधिकाऱ्यांच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे. तलावाच्या मध्यभागातून जाणारी झिपलाइन ही साहसी पर्यटनातील जोखमीची ॲक्टिव्हिटी असल्याने तांत्रिक स्थिरता, सुरक्षा उपकरणे, प्रशिक्षित कर्मचारी, आपत्कालीन बचाव व्यवस्था आणि आपत्ती व्यवस्थापन आराखडा याबाबत आवश्यक नियमांचे पालन होणे गरजेचे असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

### आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण सोहळा संपन्न



नाशिक (स. गांवकरी) : शिक्षक दिनाचे औचित्य साधत नाशिक शहरातील आदर्श महिला शिक्षकांचा सन्मान दि. 7 सप्टेंबर रोजी देवळाली कॅम्प येथे संपन्न झाला. अखंड ज्योती महिला फाउंडेशनच्या वर्धापन दिन निमित्ताने नाशिक गौरव पुरस्काराचे वितरण करण्यात आले. यात चाळीस महिलांना नाशिक गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच आषाढी एकादशी निमित्ताने ऑनलाईन रिल्स स्पर्धा घेण्यात आली. तीन वर्गवारी मध्ये सर्वोत्कृष्ट नऊ विजेते काढण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून सुभाष गुज्जर हायस्कूलच्या मुख्याध्यापिका सिमरन चावला, इनर व्हील क्लब च्या प्रेसिडेंट मोहिनी मनचंदा, द सॉफ्ट टेन कोड च्या मॅनेजिंग डायरेक्टर एडवोकेट दीप्ती घनश्याम गवळी, समता शिक्षक परिषदेचे अध्यक्ष चंद्रकांत गायकवाड, चंद्रकांत देवरे, महावीर इंटरनॅशनल चे अनिल नहार, नंदिनी कारिया, हितेश कारिया, शैलजा गर्ग आधी प्रमुख पाहुणे उपस्थित होते. कार्यक्रमास अखंड ज्योती महिला फाउंडेशनच्या संस्थापिका ज्योती जॉर्ज गवळी, सचिव सुनीता मोरे, शहराध्यक्ष सपना दळवी, मॉडेल एक्ट्रेस आरती जैन, पुष्पा कासार, वर्षा चौधरी, शुभांगी गीत, मनीषा बोडाई, सोनाली आहेर, मनीषा गायकवाड रचना चिंतावर, आदी सदस्य उपस्थित होते. मंगळागौर तसेच पारंपारिक नृत्य याचे सादरीकरण झाले. सुरेखा मैंद, सरिता परदेशी यांनी नृत्य सादर केले तसेच रूपाली बोडाई यांनी सुगम गीत गायले. उर्मिला जाधव यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तसेच आभार प्रदर्शन आरती जैन यांनी केले.

## "गुणांपेक्षा ज्ञान, कौशल्य आणि संस्कार महत्त्वाचे..

अहिल्यानगर : (स. गांवकरी)



शिक्षणाची प्रक्रिया केवळ पुस्तकी ज्ञानापुरती मर्यादित न राहता विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला केंद्रस्थानी ठेवणारी असावी. विद्यार्थ्यांच्या क्षमता, आवडी-निवडी आणि भविष्यातील गरजा लक्षात घेऊन शिक्षण देणे काळाची गरज आहे. बदलत्या काळानुसार शैक्षणिक क्षेत्रातही सकारात्मक बदल स्वीकारणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन मेस्टा संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रा. देविदास गोडसे पाटील यांनी केले.

वडझिरे येथील इंग्रजी माध्यमाच्या शाळेच्या नूतन वास्तूच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी जिल्हाभरातील विविध शिक्षण संस्थांचे संस्थाचालक, शिक्षक तसेच शिक्षण क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. मार्गदर्शन करताना प्रा. गोडसे पाटील यांनी नवीन शाळा सुरू करताना घ्यावयाची काळजी, बदलती शैक्षणिक व्यवस्था, नवीन शैक्षणिक धोरणे, विद्यार्थी-पालक यांच्यातील समन्वय तसेच शाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास याबाबत संस्थाचालकांना मार्गदर्शन केले.

ते म्हणाले, आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांना केवळ गुण मिळविण्यासाठी तयार करणे पुरेसे नाही. त्यांच्यामध्ये ज्ञान, कौशल्य, आत्मविश्वास, संस्कार, क्रीडाभावना आणि सामाजिक जाणीव निर्माण करण्याची जबाबदारी शिक्षण संस्थांची आहे. शाळा ही केवळ शिक्षण देणारी संस्था न राहता विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाचे केंद्र बनली पाहिजे. वडझिरे येथील नूतन वास्तूमुळे परिसरातील विद्यार्थ्यांना आधुनिक आणि दर्जेदार शैक्षणिक सुविधा उपलब्ध होणार आहेत. गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबतच संस्कारक्षम आणि आत्मविश्वासू पिढी घडविण्याचे कार्य या शाळेने करावे, अशा शुभेच्छा उपस्थित मान्यवरांनी दिल्या. यावेळी प्रा. संजय खराडे (जिल्हा क्रीडा प्रमुख), सचिन अनारसे (सचिव, कर्जत), नागनाथ पानसरे (अध्यक्ष, श्रीगोंदा), रामभाऊ पाटील (अध्यक्ष, कर्जत), मापारी सर (डीबीएम इंग्रजी माध्यम शाळा), संतोष मगर (गुरुदेव शिक्षण संस्था), जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षक शंभू दुधाडे, महानगर बँकेचे शत्रुघ्न नवगण यांच्यासह जिल्हाभरातील विविध शिक्षण संस्थांचे संस्थाचालक, शिक्षक व मान्यवर उपस्थित होते. उद्घाटन सोहळ्यास जिल्हाभरातून शिक्षण क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून नूतन वास्तूस शुभेच्छा दिल्या. उत्साहपूर्ण वातावरणात झालेल्या या उद्घाटन सोहळ्यामुळे वडझिरे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते.

## पाच एकर उडदावर फिरवला रोटर; पीक गेले मातीत

सोलापूर : (स. गांवकरी)



पावसाळा सुरू होऊन तीन महिने उलटले, तरी अपेक्षित पाऊस न झाल्याने खरीप हंगामातील पिके करपण्यास सुरुवात झाली आहे. पिकाला पाणी देण्यासाठी बोरवेल अथवा विहिरीतही पाणी उपलब्ध नसल्याने कारंबा (ता. उत्तर सोलापूर) येथील शेतकरी धनराज तंबाके यांनी हतबल होऊन तब्बल पाच एकर क्षेत्रातील उडदाच्या पिकावर ट्रॅक्टरच्या साहाय्याने रोटर फिरवला. उभे पीक काढून टाकण्याची वेळ आल्याने शेतकऱ्यांच्या आर्थिक संकटाचे गांभीर्य अधोरेखित झाले आहे. जुलैच्या शेवटच्या आठवड्यात झालेल्या हलक्या पावसाच्या आधारावर शेतकऱ्यांनी खरीप पिकांची पेरणी केली. त्यानंतर मात्र पावसाने दडी मारल्याने उगवून आलेल्या पिकांना वाढीसाठी आवश्यक ओलावा मिळाला नाही. परिणामी उडीद, मूग, सोयाबीन आणि तूर या पिकांवर मोठा परिणाम झाला असून अनेक ठिकाणी पिके करपून जाण्याच्या स्थितीत आहेत. तंबाके यांच्या पाच एकर शेतातील उडदाचे पीक पावसाअभावी पूर्णपणे संकटात आले होते. पिकाला पाणी देण्यासाठी उपलब्ध जलस्रोतांमध्येही पुरेसे पाणी नसल्याने पीक वाचवणे अशक्य झाले. अखेर उत्पादन मिळण्याची आशा सोडून त्यांनी ट्रॅक्टरच्या सहाय्याने रोटर फिरवून उभे उडदाचे पीक काढून टाकले.

## बिबट्या जेरबंद; परिसरातील वावरामुळे ग्रामस्थांमध्ये अद्याप धाक

- वनविभागाकडून सतर्कतेचे आवाहन
- रात्रीच्या वेळी शेतात एकटे जाणे टाळण्याचा सल्ला

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

देवीभोयरे परिसरात गेल्या काही दिवसांपासून बिबट्याचा वावर असल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. ग्रामस्थांच्या मागणीनंतर वनविभागाने देवीभोयरे-पारनेर क्रांती साखर कारखाना मार्गावरील काळाई परिसरात ज्ञानदेव बाबूराव बेलोटे यांच्या घराजवळ पिंजरा लावला होता. अखेर या पिंजऱ्यात बिबट्या जेरबंद झाला असून वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी त्याला सुरक्षितपणे ताब्यात घेतले.

देवीभोयरे परिसरात बिबट्याचे वारंवार दर्शन होत असल्याने ग्रामस्थांमध्ये चिंता वाढली होती. शेतकरी व पशुपालकांना दिवसा जनावरे चारण्यासाठी नेताना तसेच रात्रीच्या वेळी त्यांची काळजी घेताना विशेष खबरदारी घ्यावी लागत होती. शेतातील कामांसाठी रात्रीच्या वेळी जाणाऱ्या नागरिकांमध्येही भीतीचे वातावरण होते. बिबट्याच्या हालचालींची माहिती वनविभागाला मिळाल्यानंतर संबंधित ठिकाणी पिंजरा लावण्यात आला.

ज्ञानदेव बेलोटे यांच्या घराजवळ लावलेल्या पिंजऱ्यात बिबट्या अडकल्याचे निदर्शनास आल्यानंतर वनविभागाला माहिती देण्यात आली. वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी तत्काळ घटनास्थळी पोहोचून बिबट्याला सुरक्षितपणे ताब्यात घेतले. बिबट्या जेरबंद झाल्याने ग्रामस्थांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

मात्र, परिसरात अन्य बिबट्यांचा वावर असण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने नागरिकांनी निष्काळजीपणा करू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. शेतकरी व पशुपालकांनी रात्रीच्या वेळी एकट्याने शेतात जाणे टाळावे, जनावरे सुरक्षित ठिकाणी बांधावीत आणि परिसरात बिबट्या किंवा अन्य वन्यप्राणी आढळल्यास त्याच्या जवळ जाऊ नये अथवा त्याला पकडण्याचा प्रयत्न करू नये. वन्यप्राणी आढळल्यास तातडीने वनविभागाला माहिती द्यावी.

## 'सर' आणि 'मॅडम'च्या भूमिकेत विद्यार्थी

### न्यू आर्टस् म्हविद्यालयात "शिक्षक दिन" झाला अविस्मरणीय!

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

रोज ज्या वर्गात विद्यार्थी म्हणून बसायचे, त्याच वर्गात एक दिवस शिक्षक म्हणून उभे राहायचे... रोज ज्या प्राचार्यांच्या खुर्चीकडे आदराने पाहायचे, त्याच खुर्चीत बसून निर्णय घ्यायचे! शिक्षक दिनाच्या निमित्ताने पारनेर येथील न्यू आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स महाविद्यालयात विद्यार्थ्यांना हा अनोखा अनुभव घेता आला. 'आज आम्ही शिक्षक' या अभिनव उपक्रमातून तब्बल ६० विद्यार्थ्यांनी दोन तास शिक्षकाची भूमिका साकारत अध्यापनासह प्रशासकीय जबाबदाऱ्यांचाही अनुभव घेतला.

शिक्षक होणे म्हणजे केवळ वर्गासमोर उभे राहून धडा शिकवणे नाही, तर प्रत्येक विद्यार्थ्याची मानसिकता समजून घेणे, त्याच्या अडचणी जाणून घेणे, वर्गाचे व्यवस्थापन करणे आणि ज्ञानासोबत संस्कारांचीही पेरणी करणे होय, याची जाणीव या उपक्रमातून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून झाली. या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थ्यांनी केवळ शिक्षकाची भूमिका साकारली नाही, तर महाविद्यालयाच्या प्रशासकीय जबाबदाऱ्याही आत्मविश्वासाने सांभाळल्या. विद्यार्थी-प्राचार्य म्हणून कार्तिक काशीकर, उपप्राचार्य म्हणून संस्कार ठाणगे, पर्यवेक्षक म्हणून संपदा तामखडे, तर समन्वयिका म्हणून तेजस्विनी डोंगरे यांनी आपापल्या जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडल्या. वर्गात शिक्षक म्हणून उभे राहिल्यानंतर विद्यार्थ्यांनी अध्यापनाचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. वर्गातील विद्यार्थ्यांचे लक्ष केंद्रित ठेवणे, विषय समजावून सांगणे, शिस्त राखणे आणि प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत पोहोचणे किती आव्हानात्मक असते, याचा अनुभव त्यांना या दोन तासांत आला.

कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. शिक्षकांना गुलाबपुष्प आणि पेन देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. विशेष म्हणजे, एक दिवसासाठी शिक्षकाची भूमिका साकारणाऱ्या विद्यार्थ्यांचाही पेन देऊन गौरव करण्यात आला.

या उपक्रमामुळे शिक्षकांविषयी विद्यार्थ्यांच्या मनात असलेला आदर अधिक दृढ झाला. त्याचबरोबर 'शिक्षक होणे किती जबाबदारीचे आहे?' याचे उत्तरही विद्यार्थ्यांना वर्गात उभे राहिल्यानंतर प्रत्यक्ष मिळाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आजच्या काळात विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी काहीसे नैराश्य आणि अभिरुचीचा अभाव दिसून येतो, ही खेदाची बाब आहे. मात्र, उत्तम भविष्यासाठी चांगले शिक्षण घेण्यासाठी धडपड करणे ही काळाची गरज आहे, असे त्यांनी सांगितले. "शिक्षक हा आईप्रमाणेच विद्यार्थ्यांची काळजी घेतो. कधी तो विद्यार्थ्यांच्या चुका पोटात घालतो, तर वेळप्रसंगी कान धरून त्याला योग्य मार्गावर आणतो," असे सांगत डॉ. आहेर यांनी शिक्षकाचे विद्यार्थ्यांच्या जीवनातील महत्त्व अधोरेखित केले. उपप्राचार्य डॉ. तुकाराम थोपटे यांनी शिक्षक हा समाजाचा कणा असल्याचे सांगितले. जीवनात चांगले संस्कार रुजविले, तरच खऱ्या





अर्थाने चांगले ज्ञान मिळेल आणि त्या ज्ञानाच्या बळावर भविष्य उज्ज्वल करता येईल, असा मोलाचा सल्ला त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. यावेळी विद्यार्थ्यांच्या वतीने वैष्णवी दुस्मान, प्रणव उबाळे, आदित्य बारगळ आणि कार्तिक काशीकर यांनी मनोगत व्यक्त करून गुरूजनांविषयी कृतज्ञता आणि आदर व्यक्त केला. कार्यक्रमास सायन्स विभागाच्या समन्वयिका प्रा. सुजाता ठुबे, सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. सिता काळे, एनसीसी विभागप्रमुख लेफ्टनंट भरत डगळे, ज्येष्ठ शिक्षक प्रा. संजय कोल्हे, प्रा. संजय बेल्हेकर यांच्यासह सर्व प्राध्यापकवृंद आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वागदरी जिल्हा परिषद गटात शिवसेना शिंदे गटाला मोठे खिंडार!

### गोगावमध्ये मोठ्या संख्येने आ. सचिनदादा कल्याणशेट्टी यांच्या उपस्थितीत प्रवेश सोहळा

अक्कलकोट : (स. गांवकरी)



वागदरी जिल्हा परिषद गटातील गोगाव येथे भारतीय जनता पक्षात मोठ्या संख्येने ग्रामस्थ व कार्यकर्त्यांनी जाहीर प्रवेश केल्याने स्थानिक राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांच्या उपस्थितीत आणि अक्कलकोट पंचायत समितीचे उपसभापती सागरदादा कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत बसवेश्वर ग्रुपसह अनेक कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला.

वागदरी जिल्हा परिषद गटात शिवसेना शिंदे गटाचे जिल्हा परिषद सदस्य निवडून येऊन अद्याप आठ महिनेही पूर्ण झालेले नसताना विकासकामे आणि दिलेली आश्वासने पूर्ण होत नसल्याची नाराजी कार्यकर्त्यांमध्ये असल्याचा दावा भाजप कार्यकर्त्यांकडून करण्यात येत आहे. यापूर्वीही मौजे सदलापूर येथील शिवसेना शिंदे गटातील मोठ्या संख्येने कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला होता. त्यानंतर आता गोगावमध्ये झालेल्या या सामूहिक पक्षप्रवेशामुळे वागदरी गटातील राजकीय समीकरणांना नवे वळण मिळण्याची शक्यता व्यक्त होत आहे. या प्रवेश सोहळ्यास आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी, पंचायत समिती उपसभापती सागरदादा कल्याणशेट्टी, जिल्हा परिषद सदस्य विकास बुळा, पंचायत समिती सदस्य अप्पासाहेब किवडे, मंडल अध्यक्ष प्रदीप पाटील, युवा नेता बसवराज शेळके,उपसरपंच कमलाकर सोनकांबळे, युवा नेते शिवराज (मंत्री) पोमाजी यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. गोगाव येथील पक्षप्रवेशाकडे आगामी स्थानिक राजकीय घडामोडींच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण घटना म्हणून पाहिले जात आहे. युवकांसह ग्रामस्थांचा भाजपकडे वाढता कल आणि सागरदादा कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वावर व्यक्त होत असलेला विश्वास यामुळे या प्रवेशाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. सागरदादा कल्याणशेट्टी यांची सर्वांना सोबत घेऊन जाण्याची कार्यपद्धती, कार्यकर्त्यांशी सातत्याने संपर्क आणि स्थानिक प्रश्नांबाबतची भूमिका यामुळे वागदरी गटातील युवक व ग्रामस्थ भाजपशी जोडले जात असल्याचे भाजप कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे. पक्षसंघटनेबरोबरच माणसे जोडण्यावर भर देत असल्याचा संदेश या पक्षप्रवेशातून देण्यात आला. या पक्षप्रवेश सोहळ्यात शिवसेनेचे तालुका उपाध्यक्ष विनोद आलुरे यांच्यासह अशोक मुलगे, महादेव बिराजदार, महेश कलशेट्टी, दत्तात्रेय पाटील, बसवराज पाटील, कलप्पा वाडे, माजी सरपंच अनिल मुलगे, मल्लिनाथ बिराजदार, बसवराज वाडे, सुरेकांत पाटील, धनराज बिराजदार, निंगण्णा तावरखेड, सुदर्शन निळ, सूर्यकांत जिरगे, मल्लिनाथ जिरगे, नागराज पाटील तसेच संपूर्ण बसवेश्वर ग्रुप व ग्रामस्थांनी भाजपमध्ये प्रवेश केला.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ३८ए, सोमेश्वर अपार्टमेंट, अदाते/शिंदे हॉस्पिटलजवळ, पुरूषोत्तम व्हिला समोर, वडगांव बुद्रुक, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 । पाने : ४ । वर्ष : ४ थे । अंक : २६७ । किंमत : ४ रूपये

Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे    POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




गुरुवार दि. १० सेप्टेंबर २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

# एजेंटिक एआय आणि क्वांटम तंत्रज्ञानाच्या माध्यमातून वित्तीय क्षेत्रात नवे परिवर्तन घडविण्याची संधी

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली माहिती



मुंबई (समर्थ गांवकरी)

डिजिटल वित्तीय क्षेत्रातील नव्या तंत्रज्ञानाचा लाभ सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, महिला उद्योजक, स्टार्टअप्स आणि सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांपर्यंत पोहोचविण्यासाठी महाराष्ट्र कटिबद्ध असून, एजेंटिक एआय आणि क्वांटम तंत्रज्ञानाच्या माध्यमातून वित्तीय समावेशनाला नवी दिशा मिळणार आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. मुंबईत वांद्रे कुर्ला संकुलातील जिओ सेंटर येथे आयोजित 'ग्लोबल फिनटेक फेस्ट २०२६' मध्ये बोलताना मुख्यमंत्र्यांनी एजंटिक एआय, टोकनायझेशन आणि क्वांटम तंत्रज्ञानाच्या माध्यमातून वित्तीय क्षेत्रात मोठे परिवर्तन घडवून आणण्याची क्षमता अधोरेखित केली. 'ग्लोबल फिनटेक फेस्ट २०२६' चे अध्यक्ष क्रिस गोपालकृष्णन, नॅशनल पेमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया च्या कार्यकारी संचालक सोहिनी राजोला, मुख्यमंत्र्यांचे गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे आदी यावेळी उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, गतवर्षी ग्लोबल फिनटेक फेस्टमध्ये महाराष्ट्राला देशातील पहिले 'टोकनाइज्ड स्टेट' बनविण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला होता. त्या दिशेने राज्य शासनाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलत 'महाराष्ट्र डिजिटायझेशन अँड एक्स्चेंज ऑफ लँड टोकन सेट क्ट (उ्रश्रीर –र्ली)' ची रूपरेषा तयार करण्याचे काम सुरू केले आहे. या कायद्याद्वारे जमीन आणि स्थावर मालमत्तेच्या ब्लॉकचेन-आधारित टोकनायझेशनसाठी आवश्यक कायदेशीर चौकट निर्माण करण्यात येणार आहे. या प्रक्रियेत सेबी, बीएसई, एनएसई, उद्योग, तंत्रज्ञान, कायदा आणि शैक्षणिक क्षेत्रातील तज्ज्ञांचा सहभाग सुनिश्चित करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. टोकनायझेशन ही स्थावर मालमत्तेमध्ये अडकलेले भांडवल उत्पादक आर्थिक संधींमध्ये रूपांतरित करण्यासाठीची प्रक्रिया आहे. यामुळे पारदर्शकता वाढेल, तरलता निर्माण होईल आणि निष्क्रिय संपत्ती आर्थिक विकासासाठी उपयोगात आणता येईल, असे मुख्यमंत्री म्हणाले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, जागतिक पातळीवरील वित्तीय क्षेत्राचे भविष्य आता भारतात आणि विशेषतः मुंबईत सुद्धा घडत आहे. देशाची आर्थिक राजधानी असलेली मुंबई जगातील उदयोन्मुख फिनटेक राजधानी म्हणूनही वेगाने पुढे येत आहे. 'पोटेन्शियल ऑफ इम्पॅक्ट' ही यंदाच्या ग्लोबल फिनटेक फेस्टची संकल्पना अत्यंत महत्त्वपूर्ण असून, तंत्रज्ञानातील क्षमता प्रत्यक्ष परिणामांमध्ये रूपांतरित करणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस (णझख) च्या माध्यमातून भारताने जगासमोर आदर्श निर्माण केला आहे. आता पुढील टप्प्यात कर्ज, गुंतवणूक, मालकी हक्क आणि वित्तीय माहितीचे लोकशाहीकरण करण्याची आवश्यकता आहे. कोल्हापूरमधील उद्योग, विदर्भातील शेतकरी किंवा पुण्यातील महिला उद्योजक यांनाही मोठ्या वित्तीय संस्थांप्रमाणेच दर्जेदार आर्थिक माहिती आणि सेवा उपलब्ध करून देण्याची क्षमता नव्या तंत्रज्ञानात असल्याचे त्यांनी नमूद केले. एजेंटिक एआयच्या माध्यमातून वित्तीय सेवांना नवी दिशा मिळणार असल्याचे सांगताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले की, भविष्यात एखाद्या उद्योजकाचा एआय सहाय्यक त्याच्या आर्थिक गरजा ओळखून योग्य वित्तीय पर्याय सुचवू शकेल. शेतकऱ्यांना त्यांच्या मातृभाषेत आर्थिक सल्ला मिळू शकेल. मात्र, एआय नागरिकांसाठी काम करत असला तरी अंतिम नियंत्रण नागरिकांच्याच हातात राहिले पाहिजे, यावर त्यांनी भर दिला.

फिनटेक क्षेत्रासाठी महाराष्ट्र बनणार 'ग्लोबल हब'

महाराष्ट्रातील वित्तीय, तांत्रिक आणि पायाभूत सुविधांच्या सामर्थ्याचा उल्लेख करताना मुख्यमंत्री म्हणाले की, मुंबई देशातील सर्वात मोठी वित्तीय परिसंस्था प्रदान करते, पुणे उत्कृष्ट तांत्रिक आणि अभियांत्रिकी कौशल्याचे केंद्र आहे, तर नवी मुंबई डेटा, पायाभूत सुविधा आणि जागतिक कनेक्टिव्हिटीचे नवे केंद्र म्हणून विकसित होत आहे.

## 'एसआयआर' प्रक्रियेनंतर मतदार यादीवर दावे-हरकतींसाठी ३० सप्टेंबरपर्यंत मुदत

मुंबई (समर्थ गांवकरी)

महाराष्ट्रातील मतदार यादीच्या विशेष संक्षिप्त पुनरिक्षण-२०२६ अंतर्गत प्रसिद्ध करण्यात आलेल्या प्रारूप मतदार यादीवर दावे आणि हरकती दाखल करण्यासाठी ३० सप्टेंबरपर्यंत मुदत देण्यात आली आहे. राज्यातील सर्व २८८ विधानसभा मतदारसंघांच्या प्रारूप मतदार याद्या ३१ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध करण्यात आल्या असून, नवमतदारांसह मतदार यादीत नाव समाविष्ट न झालेल्या पात्र नागरिकांना या कालावधीत अर्ज करण्याची संधी देण्यात आली आहे. मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी नमुना-६ मध्ये अर्ज करता येणार आहे. मतदार यादीतील एखाद्या नावाच्या समावेशावर हरकत असल्यास संबंधित मतदारसंघातील मतदाराला नमुना-७ मध्ये अर्ज करता येईल. याशिवाय मतदार यादीतील नोंदींमध्ये दुरुस्ती, मतदार ओळखपत्र बदलणे किंवा दिव्यांग चिन्हांकनासाठी नमुना-८ मध्ये अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. मतदारसंघाच्या आत स्थलांतर झाल्यामुळे पत्ता बदलायचा असल्यासही नमुना-८ मध्ये अर्ज करता येणार आहे. त्याचप्रमाणे मतदारसंघाबाहेर स्थलांतर झालेल्या मतदारांसाठीही पत्ता बदलाची स्वतंत्र नोंद नमुना-८ अंतर्गत करता येणार असल्याचे निवडणूक विभागाने स्पष्ट केले आहे. दावे आणि हरकती दाखल झाल्यानंतर त्यासंदर्भातील यादी संबंधित मतदार नोंदणी अधिकाऱ्यांकडून सूचना फलकावर प्रसिद्ध केली जाणार आहे. त्यानंतर सात दिवसांचा कालावधी पूर्ण झाल्यावर त्यावर निर्णय घेण्यात येणार आहे. सध्या सुरू असलेल्या विशेष संक्षिप्त पुनरिक्षण प्रक्रियेत दाखल झालेल्या दावे-हरकतींचा तपशीलही निवडणूक विभागाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिला जाणार आहे.




## संक्षिप्त

### कुणबी प्रमाणपत्रांसाठी ४० महसूल मंडळांत विशेष शिबिरे

हिंगोली (समर्थ गांवकरी)

कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा जात प्रमाणपत्रांची कार्यवाही गतिमान करण्यासाठी हिंगोली जिल्ह्यातील सर्व ४० महसूल मंडळांत १० ते १७ सप्टेंबर २०२६ दरम्यान विशेष शिबिरे आयोजित करण्यात आली आहेत. नागरिकांनी आवश्यक कागदपत्रे व उपलब्ध पुराव्यांसह संबंधित महसूल मंडळातील शिबिरात उपस्थित राहून अर्ज नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. या विशेष शिबिरांमध्ये जुन्या महसूल नोंदी व अन्य पुरावे शोधणे, प्राप्त अर्ज व कागदपत्रांची तातडीने पडताळणी करणे आणि पात्र लाभार्थ्यांना जात प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्यावर भर दिला जाणार आहे. नागरिकांच्या अडचणींचे तातडीने निराकरण करण्यासाठी वसमतचे उपविभागीय अधिकारी विकास माने यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. ते तहसीलदार, उपविभागीय अधिकारी आणि जात प्रमाणपत्र पडताळणी समितीशी समन्वय साधून प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी कार्यवाही करणार आहेत.

### ऑस्ट्रेलिया 'अ' मालिकेसाठी भारत 'अ' संघाची घोषणा

हार्दिक पांड्याची एकदिवसीय संघात निवड

नवी दिल्ली (समर्थ गांवकरी)

नवी दिल्ली येथे भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (BCCI) पुरुष निवड समितीने ऑस्ट्रेलिया 'अ' विरुद्ध होणाऱ्या तीन एकदिवसीय आणि दोन बहु-दिवसीय सामन्यांच्या मालिकेसाठी भारत 'अ' संघाची घोषणा केली आहे. या मालिकेतील सर्व सामने पुद्दुचेरी येथे खेळवले जाणार आहेत. स्टार अष्टपैलू खेळाडू हार्दिक पांड्याचा एकदिवसीय संघात समावेश करण्यात आला असून, यामुळे क्रिकेटप्रेमींमध्ये उत्सुकता वाढली आहे.

### प्रथिनांच्या रचनेनंतर आता मानवी जनुकाचे रहस्य उलगडणार

गुगल डीपमाइंडचे 'अल्फाजीनोम टलास' लाँच

नवी दिल्ली (समर्थ गांवकरी)

सुमारे आठ वर्षांपूर्वी गुगलच्या 'डीपमाइंड' या संशोधन संस्थेने जीवशास्त्राच्या गूढ जगाचा अभ्यास करण्यास सुरुवात केली होती. या संशोधनाला मोठे यश मिळून २०२४ मध्ये डीपमाइंडचे सह-संस्थापक डेमिस हसाबीस आणि संशोधक जॉन जंपर यांना रसायनशास्त्रातील नोबेल पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांनी 'अल्फाफोल्ड' या एआय तंत्रज्ञानाच्या मदतीने प्रथिनांची त्रिमितीय (3D) रचना कशी असते, याचा अचूक अंदाज लावून विज्ञानाच्या क्षेत्रात एक नवा इतिहास रचला होता. आता याच यशाच्या पुढे पाऊल टाकत, डीपमाइंडने प्रथिनांच्या अभ्यासाकडून मानवी जनुकांसारख्या (ह्युमन जीनोम) अधिक व्यापक आणि गुंतागुंतीच्या विषयाकडे आपले लक्ष वळवले आहे.

### गणेशोत्सवात होणार भक्तांची मोफत आरोग्य तपासणी? कुठे मिळणार फायदा

मुंबई: गणेशोत्सवाच्या काळामध्ये महाराष्ट्र सरकारकडून भक्तांच्या आरोग्याची काळजी घेत 'मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष'च्या पुढाकाराने आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे. महाराष्ट्र सरकारकडून राज्यभरात तब्बल २० हजार मोफत आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत. सार्वजनिक गणेश मंडळांच्या मंडपांपासून महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायत तसेच ग्रामीण भागापर्यंत अशा प्रत्येक ठिकाणी ही सुविधा नागरिकांना उपलब्ध करून देण्यात येणार आहे. 'श्रीगणेशा आरोग्याचा' असं या उपक्रमाचे नाव असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम सुरू झाला आहे.

# आळंदी शहरातील संपूर्ण पाणीपुरवठा गुरुवारी बंद राहणार : मुख्याधिकारी खांडेकर

## नागरिकांनी नगरपरिषदेस सहकार्य करण्याचे प्रशासनाचे आवाहन

आळंदी (समर्थ गांवकरी)

भामा-आसखेड प्रकल्पातून आळंदी शहराला होणाऱ्या पाणी पुरवठ्याच्या विद्युत पंपिंग विषयक आणि स्थापत्य विषयक तातडीची देखभाल व दुरुस्तीची कामे हाती घेण्यात येणार आहेत.

यामुळे बुधवार ( दि. ९) रात्री १२:०० पासून ते गुरुवार ( दि. १० ) रात्री १२ : ०/ पर्यंत म्हणजेच सुमारे २४ तासांसाठी - भामा-आसखेड मधून आळंदी शहराला होणारा संपूर्ण पाणी पुरवठा बंद राहणार आहे.

या मुळे नागरिकांनी नगरपरिषदेस सहकार्य करून पाण्याचा वापर कमी करून नासाडी करू नये. आधीच आवश्यक तेवढा पाणीसाठा उपलब्ध करून ठेवणे, या काळात पाण्याचा काटकसरीने व विवेकपूर्ण वापर करणे, कामे पूर्ण झाल्यावर पाणी पुरवठा टप्प्या-टप्प्याने पूर्ववत होईल, मात्र काही भागात सुरुवातीला कमी दाबाने किंवा विलंबाने पाणी येण्याची शक्यता असल्याचे मुख्याधिकारी खांडेकर यांनी सांगितले.

नगरपरिषदेने अनावश्यक पाण्याचा वापर टाळण्याचे आणि प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन मुख्याधिकारी माधव खांडेकर यांनी केले आहे.

# न्या. महेश चंद्र त्रिपाठी यांनी घेतली मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्ती पदाची शपथ




मुंबई (समर्थ गांवकरी)

राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी बुधवारी लोकभवन येथे झालेल्या छोटेखानी शपथविधी समारंभात अलाहाबाद उच्च न्यायालयातील न्यायमूर्ती महेश चंद्र त्रिपाठी यांना मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्ती पदाची शपथ दिली. शपथ प्रदान केल्यानंतर राज्यपाल, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी पुष्पगुच्छ देऊन न्या. त्रिपाठी यांचे अभिनंदन केले.

यावेळी महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, उपसभापती सचिन अहिर, मंत्री छगन भुजबळ, मंत्री मंगल प्रभात लोढा, मुंबईच्या महापौर रितू तावडे, मुंबई उच्च न्यायालयातील न्यायमूर्ती तसेच अलाहाबाद उच्च न्यायालयातील न्यायमूर्ती उपस्थित होते. मुंबई उच्च न्यायालयाच्या निवृत्त मुख्य न्यायमूर्ती सुजाता मनोहर आणि न्यायमूर्ती मोहित शाह यांसह अनेक मान्यवर या समारंभास उपस्थित होते. न्यायमूर्ती चंद्रशेखर यांची सर्वोच्च न्यायालयात न्यायमूर्ती पदी नियुक्ती झाल्यामुळे मुंबई उच्च न्यायालयातील मुख्य न्यायमूर्ती पद रिक्त झाले होते. न्यायमूर्ती रवींद्र घुगे हे मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशपदाचा अतिरिक्त कार्यभार सांभाळत होते.

# अमरावतीतील वाघिणीला जेरबंद करण्यासाठी तातडीने रेस्क्यू मोहीम राबवा; नागरिकांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य : महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे



मुंबई (समर्थ गांवकरी)

अमरावती वन विभागातील वाघिणीच्या वाढत्या हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर वन्यप्राण्यांचा तातडीने बचाव करणे आणि नागरिकांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देणे अत्यंत आवश्यक असल्याचे स्पष्ट करत, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी तातडीने रेस्क्यू पथके रवाना करण्याचे निर्देश दिले आहेत. बाधित भागात तातडीने परिस्थितीचा आढावा घेऊन संपूर्ण मोहिमेदरम्यान नागरिकांच्या सुरक्षेसाठी वन विभागाची यंत्रणा पूर्ण क्षमतेने सतर्क ठेवण्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. मंत्रालयात वनमंत्री गणेश नाईक यांच्या प्रमुख उपस्थितीत अमरावती वन विभागातील वाघिणीच्या हल्ल्याबाबत एक उच्चस्तरीय बैठक पार पडली. या बैठकीला प्रत्यक्ष उपस्थितीमध्ये आमदार रवी राणा, गजानन लवटे, उमेश यावलकर, प्रताप अडसड, विधान परिषदेचे आमदार प्रवीण पोटे-पाटील आणि वन विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर हे अधिकारी उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासह अद्ययावत सुविधांची निर्मिती करावी : मंत्री दादाजी भुसे

## 'चला शाळेत जाऊया' अभियानाचा आढावा

नागपूर (समर्थ गांवकरी)

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळेत विद्यार्थीकेंद्रित वातावरण निर्माण करण्यावर भर द्यावा. राज्य शासनासाठी शिक्षण क्षेत्र प्राधान्यक्रमावर असून शाळांच्या विकासासाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही. त्यादृष्टीने शिक्षकांची जबाबदारी वाढली असून विद्यार्थ्यांसाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण व अद्ययावत सुविधांची निर्मिती करण्याचे आदेश शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी आज येथे दिले.

'चला शाळेत जाऊया' अभियानाच्या अंमलबजावणीबाबत आज नागपूर येथे घेण्यात आलेल्या बैठकीत मंत्री भुसे बोलत होते. त्यांच्या प्रमुख उपस्थितीत येथील सेंट उर्सुला गर्ल्स हायस्कूलच्या सभागृहात आयोजित बैठकीस महापौर नीता ठाकरे, उपमहापौर लीना हाथीबेड, माध्यमिक उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे विभागीय अध्यक्ष शिवलिंग पटवे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) अनिल दहिफळे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) निलेश गुंड, महापालिका शिक्षणाधिकारी अमित भदाणे, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्य हर्षलता बुराडे , सेंट उर्सुला हायस्कूलच्या संचालक रचना सिंग, सेंट उर्सुला हायस्कूलच्या मुख्याध्यापक श्रीमती शितल पीटर,अधीक्षक विशाल गौर यांच्यासह शिक्षण विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

योजनांच्या बैठका व आढावा याचे प्रतिबिंब विद्यार्थ्यांच्या प्रगतीमध्ये व शाळांच्या भौतिक विकासात दिसले पाहिजे असे सांगून श्री भुसे म्हणाले, विद्यार्थ्यांना शुद्ध पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, विजेची सोय, आवश्यक फर्निचर आणि आधुनिक ई-सुविधा उपलब्ध करून देण्याचे नियोजन करावे. वर्गखोल्यांची दुरुस्ती, नवीन वर्गखोल्यांचे बांधकाम, शाळा परिसराची स्वच्छता, क्रीडांगणे विकसित करणे आणि कुंपण भिंत उभारण्याच्या कामांना प्राधान्य देण्यात यावे. शिक्षकांच्या भरतीमुळे हा विभाग अधिक परिपूर्ण होत असून जिल्हा व तालुकास्तरावरील शाळांनी त्यांची संकलित माहिती योग्य पद्धतीने पोर्टलवर भरण्याचे आदेश त्यांनी दिले.

शाळांचा गुणात्मक दर्जा सुधारण्यासाठी आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागामार्फत 'चला शाळेत जाऊया' हे विशेष अभियान राबवले जात आहे. या अभियानात पालकमंत्री, लोकप्रतिनिधी,वरिष्ठ अधिकारी शाळांना भेटी देत आहेत. त्यात आपण स्थानिकांचा सहभागही मिळवावा. त्यातून आपल्या शाळांचे प्रश्न सोडविण्यावर भर द्यावा. या भेटींमुळे अधिकाऱ्यांना शाळांच्या प्रत्यक्ष स्थितीचा आढावा घेणे सुलभ होणार असून शिक्षणविषयक समस्यांवर उपाययोजना करता येणे शक्य होईल.

शाळांनी केलेल्या सादरीकरणातून श्री भुसे यांनी शाळांची शैक्षणिक पद्धत, शिक्षकांचे नावीन्यपूर्ण उपक्रम, त्यांना येणाऱ्या अडचणींची माहिती यावेळी घेतली. शाळांमध्ये शैक्षणिक वातावरणासोबतच सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी कला-क्रीडा स्पर्धा, सहली, पालक मेळावे, स्नेहसंमेलने आणि माजी विद्यार्थी संघांच्या मेळाव्यांचेही आयोजन करण्यात यावे, असे त्यांनी सांगितले.

'आयडॉल बँके'तील अनुभवाचा उपयोग : मागील वर्षापासून उत्कृष्ट काम करणारे शिक्षक, शाळा व्यवस्थापन समित्या आणि चांगल्या कामगिरी करणाऱ्या शाळांची 'आयडॉल बँक' तयार करण्यात आली आहे. या शिक्षकांच्या ज्ञानाचा आणि अनुभवाचा उपयोग इतर शाळांमध्येही सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी केला जात असून एखाद्या शिक्षकाने किंवा शाळेने केलेला यशस्वी प्रयोग व्यापक स्तरावर इतर शाळांमध्ये कसा राबविता येईल, याचे नियोजन करण्यात यावे असे दादाजी भुसे यांनी सांगितले. आयडॉल शिक्षक, गुणवंत विद्यार्थी व सीएसआर फंड ( सामाजिक उत्तरदायित्व निधी) देण्याऱ्या संस्था प्रतिनिधींचा सत्कार यावेळी करण्यात आला. शिक्षकांनी, सामाजिक संस्थांनी अनुभव कथन केले.



# नवीन अणूऊर्जा प्रकल्पांमुळे स्वच्छ ऊर्जा निर्मितीत वाढ होणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## टोरेंट पॉवर आणि जेएसडब्ल्यू एनर्जी लिमिटेड समवेत दोन महत्त्वाचे सामंजस्य करार



मुंबई (समर्थ गांवकरी)

- ४२०० मेगावॅट क्षमतेचे अणुऊर्जा प्रकल्प, ७९ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक
- प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष ११ हजार ७०० रोजगार निर्मिती

राज्याची स्वच्छ ऊर्जेची गरज पूर्ण करण्यासाठी सौर आणि पवन ऊर्जेच्या वापरात राज्याने लक्षणीय प्रगती केली आहे. अणुऊर्जा हा सक्षम आणि महत्त्वाचा पर्याय म्हणून पुढे आला आहे. राज्याची ऊर्जेची गरज पूर्ण करताना ऊर्जा निर्मितीचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी नवीन ऊर्जा प्रकल्पांच्या उभारणीमुळे अणुऊर्जेच्या निर्मिती क्षमतेत मोठी वाढ शक्य होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

यावेळी ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे – बोर्डीकर, आमदार अभिमन्यू पवार, ऊर्जा विभागाचे अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, महापारेषणचे अध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी विक्रम कुमार तसेच महाजनकोचे अध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी राधाकृष्णन बी., तसेच समीर मेहता, टोरेंट पॉवर आणि जेएसडब्ल्यू एनर्जी लिमिटेडचे प्रतिनिधी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, केंद्र सरकारने 'शांती' कायद्याला मान्यता दिल्यानंतर अणुऊर्जा क्षेत्र खासगी क्षेत्रासाठी खुले झाले असून, गुंतवणुकीच्या मोठ्या संधी निर्माण झाल्या आहेत. तारापूर अणुऊर्जा प्रकल्प गेल्या अनेक दशकांपासून देशाची सेवा करत आहे. स्वच्छ ऊर्जा उपक्रमांमध्ये अणुऊर्जेची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. सौर आणि पवन ऊर्जेच्या वापरात राज्याने लक्षणीय प्रगती केली आहे. त्याचबरोबर पंप्ड स्टोरेज प्रकल्पही मोठ्या प्रमाणावर उभारण्यात येत आहेत. टोरेंट पॉवरचा कर्जत येथील प्रकल्पही महत्त्वाकांक्षी ठरणार आहे. तथापि, अखंडित वीजपुरवठ्यासाठी आवश्यक मूलभूत वीजभाराचा विचार करता अणुऊर्जा हा प्रभावी आणि स्वच्छ पर्याय आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

अणुऊर्जा क्षेत्रात राज्याने यापूर्वी केंद्र सरकारच्या तसेच खासगी कंपन्यांसोबत तीन करार केले आहेत. अमेरिकेतील प्रमुख अणुऊर्जा कंपन्यांच्या शिष्टमंडळासोबतही यासंदर्भात चर्चा झाली असून, त्यांनी महाराष्ट्रात गुंतवणूक करण्यास उत्सुकता दर्शविली आहे, असे मुख्यमंत्र्यांनी नमूद केले.

देशात विकसित करण्यात आलेल्या स्वदेशी अणुभट्ट्या तसेच थोरियम आधारित तंत्रज्ञानाच्या चाचण्यांमुळे अणुऊर्जा क्षेत्रात नव्या संधी निर्माण झाल्या आहेत.

हे क्षेत्र उदयोन्मुख असून या क्षेत्रात काम करणाऱ्या कंपन्यांच्या प्रवासात राज्य शासन सहप्रवासी म्हणून पूर्ण सहकार्य करेल,टोरेंट पॉवर आणि जेएसडब्ल्यू एनर्जी लिमिटेड सोबत झालेल्या या दोन करारांमुळे महाराष्ट्राच्या अणुऊर्जा निर्मिती क्षमतेला आणखी बळ मिळणार आहे. असे सांगून मुख्यमंत्री फडणवीस यांनी टोरेंट पॉवर आणि जेएसडब्ल्यू एनर्जी लिमिटेडचे अभिनंदन केले.

# जवळकेच्या मातीतील कीर्तनसेवा थेट गोव्याच्या भूमीत; ह.भ.प. साईराम महाराज रहाणे यांची आज गोव्यात कीर्तनसेवा

जवळके(समर्थ गांवकरी)



जवळके येथील सुपुत्र तथा वारकरी संप्रदायाचे सेवेकरी ह.भ.प. साईराम महाराज रहाणे यांची आज गुरुवार दि. १० सप्टेंबर रोजी गोवा येथे कीर्तन सेवा संपन्न होणार आहे. सिद्धी साई भक्त मंडळ, गोवा यांच्या वतीने पालये तुये पेडणे, गोवा येथे सायंकाळी ६ ते ८ या वेळेत या कीर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

ग्रामीण भागात राहून वारकरी संप्रदायाची पताका उंचावत अध्यात्म, भक्ती आणि प्रबोधनाची सेवा करणाऱ्या साईराम महाराज रहाणे यांना थेट गोव्याच्या भूमीत कीर्तनसेवेची संधी मिळाल्याने जवळकेसह परिसरातील भाविकांमध्ये आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

कीर्तन सेवेसाठी रवाना होण्यापूर्वी आज सकाळी महाराज व त्यांच्या टीमने शिर्डी येथे साईबाबांचे दर्शन घेतले. साईबाबांचे आशीर्वाद घेऊन संपूर्ण टीम गोव्याच्या दिशेने रवाना झाली.

गोव्याच्या भूमीत साई नामाचा गजर, भक्तीचा सागर आणि संतविचारांचा जागर घडणार असून, या कीर्तन सेवेकडे गोव्यातील भाविकांसह जवळके परिसरातील नागरिकांचेही लक्ष लागले आहे. ग्रामीण भागातील एका वारकरी सेवेकऱ्याची कीर्तनसेवा थेट गोव्यापर्यंत पोहोचल्याने जवळकेच्या आध्यात्मिक परंपरेला एक नवा मान मिळाला आहे.

# संगमनेर बसस्थानकाचे मुख्य गेट बंद झाल्याने जनतेचे हाल

- बसस्थानकाचे मुख्य गेट बंद असल्याने दिवसभर संगमनेरात वाहतूक कोंडी
- संगमनेरात अजब प्रकार, महायुतीच्या सत्ताधाऱ्यांकडून जनतेची अडवणूक, राज्यभरातून प्रतिक्रिया

संगमनेर (समर्थ गांवकरी)

लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी संगमनेर शहराच्या मध्यवर्ती हायटेक बस स्थानक उभारले आहेत. मात्र सध्या महायुतीच्या सत्ताधाऱ्यांनी या हायटेक बसस्थानकाचा वापर फक्त राजकारणासाठी केला असून आज दहीहंडीच्या निमित्ताने मुख्य प्रवेशद्वार बंद झाल्याने व्यापारी, नागरिक, जनता व प्रवासी यांचे मोठे हाल झाले तसेच दिवसभर गेट बंद असल्याने संगमनेर शहरांमध्ये प्रचंड वाहतूक कोंडी निर्माण झाली. या अजब गैरप्रकाराबाबत संपूर्ण तालुक्यासह राज्यभरातून संतप्त तीव्र प्रतिक्रिया उमटल्या आहेत.

संगमनेर शहरी व्यापारी दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे शहर आहे दररोज लाखो नागरिकांची वर्दळ संगमनेर शहरांमध्ये असते. हायटेक बस स्थानक हे मध्यवर्ती ठिकाणी असून पूर्वेच्या बाजूने मुख्य दरवाजा आहे. मात्र महायुतीचे सध्याचे सत्ताधारी यांनी दहीहंडीच्या नावाखाली हे गेट बंद करण्याचा अट्टाहास केला. आणि त्याला प्रशासन बळी पडले. संगमनेर मध्ये असे प्रकार कधीही झाले नव्हते यामुळे बसस्थानकावरील सर्व व्यापारी, नागरिक शालेय विद्यार्थी महिला व बाहेरून येणारे प्रवासी यांचे मोठे हाल झाले.

नाशिक पुणे नाशिक अहिल्यानगर यांचा उत्तर आणि पश्चिम महाराष्ट्राला जोडणारे संगमनेर हे मध्यवर्ती केंद्र आहे. या ठिकाणाहून बसच्या शेकडो फेऱ्या होत असतात. या सर्व फेऱ्या अकोला रोडच्या बाजूने वळवल्याने सर्व बाजूने दिवसभर शहरांमध्ये मोठी वाहतूक कोंडी झाली. आणि याचा मनस्ताप सर्वसामान्य नागरिकांना सहन करावा लागला.

यामध्ये शालेय विद्यार्थी, वृद्ध नागरिक , महिला यांनाही मोठा त्रास झाला. चौकशी केली असता या ठिकाणी विद्यमान सत्ताधारी आमदार यांची दहीहंडी असल्याने हे गेट बंद करण्यात आल्याचे एसटी डेपो प्रशासनाने सांगितले. यावर नागरिकांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केले आहेत.

यापूर्वी अशी कधीही गेट बंदी केली नव्हती. सणांना हिंदू संस्कृतीमध्ये मोठे महत्त्व आहे. मात्र आतातायीपणा करत सर्वसामान्य नागरिकांना वेठीस धरण्याचा अजब प्रकार संगमनेर मध्ये घडला आहे. नुकतेच पुण्यामध्ये डीजेविरुद्ध आंदोलन झाले आणि सन साजरे करण्यामध्ये डीजे किंवा सर्वसामान्य त्रास होऊ नये अशी मागणी संपूर्ण महाराष्ट्रातून होऊ लागली. या मागणीला संगमनेर मधून हरताळ फासला जात असून आता डायरेक्ट एसटीचे गेट बंद करण्यापर्यंत सत्ताधाऱ्यांची मजल गेली आहे.

हा अत्यंत गैरप्रकार असून सर्वसामान्य त्रास देण्याच्या असल्याचे सोमेश्वर दिवटे ,निखिल पापडेजा, विद्यार्थी संघटनेचे अनिकेत घुले, संकेत गुंजाळ, राजेश क्षीरसागर, पल्लवी सोनवणे, प्रतीक्षा गुंजाळ, ज्ञानेश्वरी मुंगसे यांच्यासह संगमनेर तालुका प्रवासी संघटना, विद्यार्थी संघटना ज्येष्ठ नागरिक संघटनेने या घटनेचा तीव्र निषेध केला आहे.




### हा अजब प्रकार

संगमनेर बसस्थानक हे मध्यवर्ती आणि सर्वांच्या सोयीचे आहे. मात्र राजकारणासाठी त्याचा वापर अत्यंत चुकीचा आहे .यामुळे अनेक शालेय विद्यार्थ्यांना त्रास झाला असून चढ–उतार व झालेल्या वाहतूक कोंडीमुळे माझा पेपर बुडाला आहे .याची सर्वस्वी जबाबदारी ही स्थानिक प्रशासनाची आहे. वाहतूक कोंडीमुळे नागरिकांचे मोठे हाल झाले असून असे प्रकार परत होऊ नये अन्यथा या ठिकाणी उपोषण करण्यात येईल

**– कार्तिकी थोरात**
**एस वाय बी एस सी विद्यार्थिनी**

# कोतुळच्या आठवडे बाजारात बैलपोळ्यासाठी चवार व मातीच्या बैलांची विक्री!

कोतुळ (समर्थ गांवकरी)

बैलपोळा सणाच्या पार्श्वभूमीवर कोतुळच्या आठवडे बाजारात आदिवासी भागातून पारंपरिक चवार तसेच कुंभारांनी तयार केलेले मातीचे बैल मोठ्या प्रमाणात विक्रीसाठी दाखल झाले आहेत. कोतुळ हे चाळीसगाव डांगवन परिसराचे प्रमुख बाजारपेठेचे केंद्र असून, आठवडे बाजार हा परिसरातील आदिवासी बांधवांसाठी महत्त्वाचा केंद्रबिंदू मानला जातो.

मुळा नदीच्या खोऱ्यातील कोतुळ परिसरात शेती आणि पशुसंवर्धनाशी जोडलेली बैलपोळ्याची परंपरा आजही जपली जात आहे. आदिवासी भागात चवार पारंपरिक पद्धतीने उंबराच्या झाडाच्या मुळापासून तयार करून वाळवली जाते. त्यापासून बैल, गाय, म्हैस, शेळी आदींच्या प्रतिकृती तसेच घरातील देवालय, घराच्या कडी–कोंड्यांना आणि वाहनांना गोंडे तयार करून बांधण्याची प्रथा आहे. दरम्यान, कुंभार समाजातील कारागीर मातीला बैलाचा आकार देऊन आकर्षक मातीचे बैल तयार करून बाजारात विक्रीस आणत आहेत. त्यामुळे कोतुळच्या आठवडे बाजारात बैलपोळ्याच्या पारंपरिक वस्तूंना चांगली मागणी पाहायला मिळत असून, ग्रामीण व आदिवासी संस्कृतीची परंपरा या माध्यमातून जपली जात आहे.



# Mjs कॉलेज खेळाडू प्रज्वल ढवळे राज्यस्तरीय स्पर्धेत तृतीय क्रमांक

श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)




अहिल्यानगर येथे पार पडलेल्या वूशू फेडरेशन जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयातील कृष्णा वायकर ७० ज्ञस, सार्थक काळे ८० ज्ञस, प्रज्वल ढवळे ७५ ज्ञस यांनी आपापल्या वजन गटांमध्ये प्रथम क्रमांक मिळविला. या गुणवंत खेळाडूंची आळंदी, पुणे येथे दिनांक ६ ते ८ सप्टेंबर २०२६ या कालावधीत संपन्न झालेल्या वूशू राज्यस्तरीय फेडरेशन स्पर्धेसाठी निवड झाली. या स्पर्धेमध्ये सर्वच खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी केली. कृष्णा वायकर, सार्थक काळे यांना सहभागावर समाधान मानावे लागले.तर प्रज्वल ढवळे या खेळाडूने राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये तृतीय क्रमांक संपादक केला..

या खेळाडूंना महाविद्यालयीन विकास समितीचे चेअरमन मा.आ. बबनराव पाचपुते, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य मा. बाबासाहेब भोस, मा. आ. राहुल जगताप, सदस्य महावीर पटवा, कॉलेजचे प्राचार्य डॉ प्रकाश साळवे, सीनि. उपप्राचार्य डॉ. सुदाम भुजबळ डॉ. नितीन थोरात, ज्युनि. उपप्राचार्य प्रा. श्रीकांत थोरात, पर्यवेक्षक प्रा.रत्नाकर झिटे, विभाग प्रमुख, सर्व शिक्षक, शिक्षक इतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

खेळाडूंना क्रीडा शिक्षक संजय डफळ, क्रीडा संचालिका कल्पना बागुल, कोच शुभम सुतार, चंद्रकांत राहिज यांचे त्यांना मोलाचे मार्गदर्शन लाभले.

# श्रीगोंद्यात अध्यक्रांतीवर उमाजी नाईक यांची जयंती उत्साहात साजरी; महिला व मुलांच्या ढोल पथकाने वेधले लक्ष




श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)

आद्यक्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांच्या २३५ व्या जयंतीनिमित्त आज श्रीगोंदा शहरात भव्य मिरवणूक आणि अभिवादन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला . या निमित्ताने काढण्यात आलेल्या मिरवणुकीत मुला–मुलींसह महिलांच्या ढोल पथकाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.प्रमुख पाहुणे भाऊसाहेब शिंदे ,खा. निलेश लंके , माजी मंत्री बबनराव पाचपुते, समाजसेविका तृप्ती देसाई स्थानिक कार्यकर्ते यांच्या उपस्थितीत राजे उमाजी नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन व आरती करून मिरवणुकीची सुरुवात करण्यात आली यावेळी बोलताना भाऊसाहेब शिंदे म्हणाले की, ब्रिटिश सत्तेविरुद्ध देशातील पहिला सशस्त्र लढा उभारणारे राजे उमाजी नाईक हे आपल्या सर्वांसाठी ऊर्जेचा मुख्य स्रोत आहेत . त्यांचा शौर्याचा इतिहास आजच्या तरुण पिढीने अंगीकारणे गरजेचे आहे.महिला व मुलांच्या ढोल पथकाचा थरारमिरवणुकीचे मुख्य आकर्षण ठरले ते मुलांचे आणि विशेषतः महिलांचे ढोल–ताशा पथक. पारंपरिक वेशभूषा आणि डोक्यावर फेटा परिधान करून महिलांनी केलेल्या शिस्तबद्ध आणि उर्जावान वादनाने संपूर्ण श्रीगोंदा शहर दणाणून सोडले. या पथकाचे कौतुक सर्वच स्तरांतून होत आहे.जयघोषाने शहर दुमदुमले'जय राजे उमाजी नाईक' अशा गगनभेदी घोषणांनी मिरवणुकीचा मार्ग दुमदुमून गेला होता. मुख्य चौकांमध्ये नागरिकांनी मिरवणुकीचे स्वागत करण्यासाठी ठिकठिकाणी उभे होते. . या सोहळ्याला श्रीगोंदा शहर व परिसरातील विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, तरुण आणि नागरिक, महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यालय

**जिल्हा वक्फ अधिकारी, पुणे**

कार्यालयाचा पत्ता–प्लॅटिनम बिल्डींग, पहिला मजला, प्लॉट नंबर ११, मंगळवार पेठ, सिंचन भवन शेजारी, पुणे ४११ ०११.

जा.क्र/जिवअ/पुणे/चौकशी/२७३/२०२६ दि. २७ ऑगस्ट २०२६

**(जाहीर प्रगटन)**

**उम्मीद अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अन्वये वक्फ संस्थेच्या योग्य प्रशासनाकरीता योजना मंजूर करणेबाबत.**

**वक्फ संस्थेचे नाव व पत्ता :** Maneri Masjid Trust, At Mace Mohalla, Vill. Junner, Tq. Junner, Dist. Pune (MSBW/PUN/396/2014)

उपरोक्त वक्फ संस्था महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळात नोंदणीकृत असून अर्जदार **श्री. अब्दुल मुनाफ अब्दुल लतीफ मनियार** यांनी **दि. २५/०२/२०२६** रोजीच्या अर्जान्वये सदर संस्थेच्या व्यवस्थापनाकरीता महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडे प्रारूप योजना दाखल केलेली आहे. प्रारूप योजनेतील तरतुदीनुसार विश्वस्तांचा कार्यकाळ **पाच** वर्षांचा असून व्यवस्थापन समिती निवडीची रीत **राजीनामा, बडतर्फी, मृत्यू व अन्य कारणांमुळे पद रिक्त झाल्यास सदर रिक्त पदी उर्वरित व्यवस्थापकीय समिती सदस्यांच्या बहुमताने पद्धतीने नवीन सदस्यांची नियुक्ती करण्यात येईल** अशी आहे. योजनेमध्ये नमूद प्रस्तावित व्यवस्थापन समिती खालीलप्रमाणे आहे:–

| अ.क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १. | अब्दुल मुनाफ अब्दुल लतीफ मनियार | अध्यक्ष |
| २. | महेमूद बनेमिया मणियार | उपाध्यक्ष |
| ३. | इर्शाद कासम आतार | सचिव |
| ४. | अमीन शमशुद्दीन मनियार | खजिनदार |
| ५. | निझमुद्दीन ए लतीफ मनियार | सभासद |
| ६. | अब्दुल रज्जाक अब्दुल लतीफ मनियार | सभासद |
| ७. | रशीद लतीफ मनियार | सभासद |
| ८. | सालीम निसार मनियार | सभासद |
| ९. | अदनान अब्दुल मुनाफ मनियार | सभासद |

सदर प्रारूप योजनेबाबत काही तक्रारी, आक्षेप असल्यास संबंधितांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ दिवसाच्या आत, जिल्हा वक्फ अधिकारी, पुणे, प्लॅटिनम बिल्डींग, पहिला मजला, प्लॉट नंबर ११, मंगळवार पेठ, सिंचन भवन शेजारी, पुणे ४११ ०११. येथे आपले म्हणणे दाखल करावे. विहीत वेळेनंतर आक्षेप प्राप्त झाल्यास त्याची दखल घेण्यात येणार नाही. याची दक्षता घ्यावी.

**जिल्हा वक्फ अधिकारी**
**(पुणे)**

# वीज कंपन्यांचे खासगीकरण नाही; कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा

## रोखलेला बोनस देण्याचे आदेश; संपातील कारवाया रद्द करण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश

मुंबई (समर्थ गांवकरी)

महाराष्ट्रातील महावितरण, महानिर्मिती आणि महापारेषण या राज्य शासनाच्या मालकीच्या वीज कंपन्यांचे कोणत्याही पद्धतीने खासगीकरण केले जाणार नाही, अशी स्पष्ट ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. वीज कंपन्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करून नफ्यात आणणे आणि पायाभूत सुविधा मजबूत करणे, हे सरकारचे धोरण असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सह्याद्री अतिथीगृह, मुंबई येथे वीज कर्मचारी, अभियंते व अधिकारी कृती समितीसोबत झालेल्या बैठकीत खासगीकरण, पेन्शन, बोनस, कंत्राटी कामगार, पुनर्रचना, पदोन्नती आदी १८ प्रलंबित मागण्यांवर चर्चा झाली. ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, तिन्ही वीज कंपन्यांचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक तसेच महाराष्ट्र वीज कामगार महासंघाचे महामंत्री अरुण पिवळ अध्यक्ष विठ्ठल भालेराव यांच्यासह १८ कामगार संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

मागील दिवाळीत रोखण्यात आलेला वीज कर्मचाऱ्यांचा बोनस तातडीने देण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी व्यवस्थापनाला दिले. महावितरणच्या पुनर्रचनेविरोधातील संपानंतर कर्मचाऱ्यांवर करण्यात आलेल्या न्यायालयीन कारवाया, परिपत्रक क्रमांक ५५५५ अंतर्गत कारवाई आणि वेतनकपात रद्द करण्याचे निर्देशही देण्यात आले. संपातील दोन दिवसांचा पगार रजा म्हणून भरून देण्याचेही आदेश देण्यात आले.

महावितरणवरील सुमारे ८० हजार कोटी रुपयांच्या कर्जाची जबाबदारी राज्य शासन टप्प्याटप्प्याने स्वीकारणार असून, कंपनीच्या १० टक्के शेअर्सच्या लिस्टिंगद्वारे भांडवल उभारण्याचा प्रस्ताव असल्याचे बैठकीत स्पष्ट करण्यात आले.

कंत्राटी कामगारांना हरियाणा पॅटर्ननुसार स्थायी रोजगार देण्याच्या मागणीवर एका महिन्यात अभ्यास करून प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. मयत कर्मचाऱ्यांच्या वारसांना सहाय्यक पदाऐवजी सरळ भरतीद्वारे स्थायी पदावर सामावून घेण्याचे निर्देशही देण्यात आले.



महावितरणच्या कार्यक्षेत्रात खासगी कंपन्यांना समांतर वीज वितरणाचा परवाना दिला जाणार नाही, अशी भूमिका मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केली. वाढत्या विजेच्या मागणीसाठी चंद्रपूर येथे ८०० मेगावॅटचा औष्णिक वीज प्रकल्प आणि पारेषणाचे जाळे मजबूत करण्याच्या उपाययोजनांनाही शासनाने प्राधान्य दिले आहे.

# थोडक्यात पण महत्त्वाचे

## श्रीगोंद्यात अध्यक्रांतीवर उमाजी नाईक यांची जयंती उत्साहात साजरी

### महिला व मुलांच्या ढोल पथकाने वेधले लक्ष




**श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)**

आद्यक्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांच्या २३५ व्या जयंतीनिमित्त आज श्रीगोंदा शहरात भव्य मिरवणूक आणि अभिवादन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला . या निमित्ताने काढण्यात आलेल्या मिरवणुकीत मुला-मुलींसह महिलांच्या ढोल पथकाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.प्रमुख पाहुणे भाऊसाहेब शिंदे ,खा.निलेश लंके , माजी मंत्री बबनराव पाचपुते, समाजसेविका तृप्ती देसाई स्थानिक कार्यकर्ते यांच्या उपस्थितीत राजे उमाजी नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन व आरती करून मिरवणुकीची सुरुवात करण्यात आली यावेळी बोलताना भाऊसाहेब शिंदे म्हणाले की, ब्रिटिश सत्तेविरुद्ध देशातील पहिला सशस्त्र लढा उभारणारे राजे उमाजी नाईक हे आपल्या सर्वांसाठी ऊर्जेचा मुख्य स्रोत आहेत . त्यांचा शौर्याचा इतिहास आजच्या तरुण पिढीने अंगीकारणे गरजेचे आहे.महिला व मुलांच्या ढोल पथकाचा थरारमिरवणुकीचे मुख्य आकर्षण ठरले ते मुलांचे आणि विशेषतः महिलांचे ढोल-ताशा पथक. पारंपरिक वेशभूषा आणि डोक्यावर फेटा परिधान करून महिलांनी केलेल्या शिस्तबद्ध आणि उर्जावान वादनाने संपूर्ण श्रीगोंदा शहर दणाणून सोडले. या पथकाचे कौतुक सर्वच स्तरांतून होत आहे.जयघोषाने शहर दुमदुमले'जय राजे उमाजी नाईक' अशा गगनभेदी घोषणांनी मिरवणुकीचा मार्ग दुमदुमून गेला होता. मुख्य चौकांमध्ये नागरिकांनी मिरवणुकीचे स्वागत करण्यासाठी ठिकठिकाणी उभे होते. . या सोहळ्याला श्रीगोंदा शहर व परिसरातील विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, तरुण आणि नागरिक, महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या वाढदिवशी आदिवासी बांधवांना मिळणार जमिनींची कायदेशीर मालकी

### गांधी जयंतीपर्यंत राज्यभर मोहीम



**श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्रात पिढ्यानपिढ्या जमिनीचा ताबा असूनही वनपट्टा न मिळालेल्या अथवा प्रत्यक्ष वहिवाटीपेक्षा अपुरा किंवा अर्धाच वनपट्टा मिळालेल्या सर्व आदिवासी बांधवांना जमिनीचा कायदेशीर मालकी हक्क देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२६ (राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती) या कालावधीत राज्यभरात हे विशेष कालबद्ध अभियान राबवले जाणार असल्याची माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी बुधवारी दिली.

अनेक आदिवासी बांधव जास्त जमिनीवर शेती करत आहेत, मात्र त्यांना १.१ किंवा अर्धाच वनपट्टा मिळाला आहे. तर काही शेतकरी जमिनीवर शेती करत असूनही त्यांना अद्याप वनपट्टा मिळालेलाच नाही. अशा सर्व वंचित आणि अपूर्ण वनपट्टाधारक आदिवासी शेतकऱ्यांचे प्रलंबित दावे निकाली काढून त्यांना अधिकारपत्र देण्यासाठी ही राज्यस्तरीय मोहीम सुरू करण्यात येत असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धम्मदीक्षेशी संबंधित दुर्मिळ दस्तऐवजांचा नवीन खंड २० ऑक्टोबर रोजी होणार प्रकाशित

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नागपूर येथे घेतलेल्या ऐतिहासिक बौद्ध धम्मदीक्षेशी संबंधित दुर्मिळ पत्रव्यवहार, कागदपत्रे आणि महत्त्वपूर्ण दस्तऐवज संकलित करून त्यांचा नवीन खंड प्रकाशित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात पार पडलेल्या बैठकीत यासंदर्भातील सूचना देण्यात आल्या.

या बैठकीला उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, तंत्रशिक्षण विभागाचे संचालक डॉ. प्रमोद नाईक, उपसचिव अशोक मांडे, उपसचिव प्रताप लुबाळ, सहसंचालक डॉ. अर्चना बोऱ्हाडे यांच्यासह समितीचे इतर सदस्य उपस्थित होते.

# अकोले नगरपंचायतीचा पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेश; १२५ विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग



**अकोले (समर्थ गांवकरी)**

शाडू मातीपासून गणेशमूर्ती निर्मिती कार्यशाळा संपन्न; निबंध व सजावट स्पर्धा १४ ते २२ सप्टेंबरदरम्यान

अकोले, दि. ९ : अकोले नगरपंचायतीमार्फत 'माझी वसुंधरा अभियान ७.०' व 'स्वच्छ सर्वेक्षण २०२६-२७' अंतर्गत पर्यावरणपूरक गणेशोत्सव – निसर्गाशी नाते जपणारा उत्सव या संकल्पनेखाली विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

या उपक्रमांतर्गत पर्यावरणपूरक गणेशमूर्ती निर्मिती कार्यशाळा दि. ९ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता योगा भवन, अकोले येथे उत्साहात संपन्न झाली. कार्यशाळेत विविध शाळांमधील सुमारे १२५ विद्यार्थी-विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. विद्यार्थ्यांना शाडू मातीपासून गणेशमूर्ती तयार करण्याचे प्रात्यक्षिक व मार्गदर्शन देण्यात आले.

या कार्यशाळेत अभिनव पब्लिक स्कूल, परफेक्ट इंग्लिश मीडियम स्कूल, अगस्ती विद्यालय व कन्या विद्यालय या शाळांमधील जवळपास १२५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

नगरपंचायतीमार्फत नागरिकांनी शाडू मातीच्या व पर्यावरणपूरक गणेशमूर्तींचा वापर करावा, पीओपीच्या मूर्ती, प्लास्टिक व थर्माकोलचा वापर टाळावा, नैसर्गिक रंगांचा वापर करावा, ध्वनिप्रदूषण टाळावे तसेच निर्माल्याचे योग्य व्यवस्थापन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. घरगुती गणेशमूर्तींचे विसर्जन नगरपंचायतीच्या कृत्रिम तलावात करावे, असेही सांगण्यात आले.

'गणेशोत्सव निबंध स्पर्धा' दि. १४/०९/२०२६ ते २२/०९/२०२६ या कालावधीत आयोजित करण्यात येणार आहेत. इच्छुक विद्यार्थ्यांनी दि. २१/०९/२०२६ पर्यंत नगरपंचायतीच्या शहर स्वच्छता विभागात नाव नोंदणी करावी.

या कार्यक्रमास नगराध्यक्षा सौ. सोनाली नाईकवाडी, उपनगराध्यक्ष शरद नवले, मुख्याधिकारी धनश्री पवार, माजी नगराध्यक्ष बाळासाहेब वडजे, नगरसेवक इंजि. प्रदीपराज नाईकवाडी, विजय पवार, नवनाथ शेटे, सागर चौधरी तसेच अमोल वैद्य, सोमेश्वर धुमाळ,रविंद्र शेणकर,नवनाथ मोहिते, मोसीन शेख यांचेसह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करूया, जलप्रदूषण व ध्वनिप्रदूषण टाळूया आणि स्वच्छ, सुंदर व हरित अकोले घडवू या, असे आवाहन अकोले नगरपंचायतीमार्फत करण्यात आले आहे.

# अहिल्यानगर भगवानबाबा मल्टीस्टेटमध्ये ४५ कोटींची फसवणूक

### १४ आरोपींचा जामीन फेटाळला; संचालक वैद्य अटकेत

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**




भगवानबाबा मल्टीस्टेटच्या नावावर गुंतवणूकदारांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल असलेल्या १४ जणांचा जामीन अर्ज न्यायालयाने फेटाळला आहे.

नितीन सोमनाथ उरे, जवाहरलाल मधुर वैभव, राम लक्ष्मण पोटभरे, किशोर अनिल सुखदेव, दिनेश श्रीधर वैद्य, योगेश तुकाराम गायकवाड, अनिल कचरू तिरसे, पार्वती महादेव राऊत, वैशाली योगेश गायकवाड आणि अनिशा महादेव सुकाळे यांच्यासह १४ जणांविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला असून हे सर्व संबंधित बालानाथाची व पाथर्डी परिसरातील रहिवासी आहेत. गुन्हा दाखल झाल्यानंतर संबंधित पसार झाले होते. दरम्यान, दिनेश वैद्य यांच्याबाबत आर्थिक गुन्हे शाखेने पोलिसांना माहिती मिळताच त्यांना ताब्यात घेऊन अटक करण्यात आली. मंगळवारी (८ सप्टेंबर) त्याला न्यायालयासमोर हजर करण्यात आले असता न्यायालयाने ११ सप्टेंबरपर्यंत तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली.श्री संत भगवानबाबा मल्टीस्टेट संस्थेच्या फसवणूक प्रकरणी तब्बल ४५ कोटींची एकत्रित तपास आर्थिक गुन्हे शाखेकडून सुरू असून या प्रकरणात फॉरेन्सिक ऑडिट करण्यात येत आहे. फॉरेन्सिक ऑडिटचा प्राथमिक अहवाल पोलिसांना प्राप्त झाला असून त्यामध्ये आतापर्यंत सुमारे १४ कोटी ५५ लाख रुपयांची फसवणूक झाल्याचे निष्पन्न झाले आहे.

दरम्यान, या संस्थेमध्ये ज्या ठेवीदारांचे पैसे अडकले आहेत, त्यांनी आर्थिक गुन्हे शाखेत उपस्थित राहून आपले जबाब नोंदवावेत, असे आवाहन सहायक पोलीस निरीक्षक देवकाते यांनी केले आहे.

# जिव्हेश्वर शिवालयात श्रावण मास निम्मित विविध कार्यक्रम संपन्न

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

सावेडी येथील गावडे मळा,पाईप लाईन रोड येथील जिव्हेश्वर शिवालय मंदिरात श्रावण महिन्याच्या निम्मिताने सलग ४ थ्या वर्षी भगवान जिव्हेश्वर शिवालयात विविध धार्मिक व सामाजिक उपक्रम संपन्न झाले असल्याची माहिती श्री व सौ वैभव आहेर यांनी दिली.

जिव्हेश्वर भक्त सेवा मंडळाच्या या मंदिरात प्रतिवर्षीप्रमाणे पवित्र श्रावण मास निमित्त सकाळी अभिषेक,महाआरती, वृक्षारोपण,बाबा बर्फानी प्रतिकृती, महाप्रसाद करण्यात आले.यावेळी आयुर्वेद शास्त्र मंडळाचे अध्यक्ष सचिन जगताप, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर अध्यक्ष नगरसेवक संपत दादा बारस्कर,सागरभाऊ मुर्तडकर,संदीपभाऊ दातरंगे,रोशनीताई आकाश त्र्यंबके,अभिजित खोसे, सुखदेव शेडाळे,मंगल राजेन्द्र शेडाळे,श्रध्दा राजेंद्र शेडाळे,शिवजीत बलभिमराव डोके,संजयजी शेळके, बाळासाहेब केरू गेरंगे,महेश कांबळे (पत्रकार), विक्रम पाठक, चंद्रकांत शेळके , बाळासाहेब बोराटे, मनोहर कलेक्षण कापड बाजार, मृणालताई कनोरे, मंदाताई पिंपरकर, सोमनाथ खाडे,प्रकाश मारवाडे,शुभम झिंजे, अमित खामकर आयोजक श्री वैभव आहेरव सौ योगिनी आहेर आदींसह नर्मदेश्वर गृप,बेलेश्वर गृप, जिव्हेश्वर भक्त सेवा मंडळ,समाज संस्थाचे मान्यवर तसेच मोठ्या संख्येने भाविक,समाज बंधूभगिनी उपस्थित होते. जगताप म्हणाले हा सोहळा समाजाला एकत्र आणणारा,पर्यावरणाप्रती जागृत करणारा आणि संस्कृतीचे जतन करणारा ठरला आहे अशा उपक्रमांमुळे समाज अधिक सुसंस्कृत आणि निसर्गाशी जोडला जातो. आयोजक आणि कार्यकर्त्यांचे नियोजन अतिशय नेटके आणि कौतुकास्पद होते. तसेच या कार्यक्रमात बालघर आश्रमातील मुलांचा एक विशेष जाहीर मानसन्मान करण्यात आला मुलांना समाज्यांच्या मुख्य प्रवाहात आणणे आणि त्यांच्या चेहऱ्यावर आनंद निर्माण करणे हा या मागचा मुख्य उद्धेश साधला गेला आहे.

कार्यक्रमानिम्मित मंदिरामध्ये आकर्षक अशी फुलांची सजावट करण्यात आली होती तर यावेळी प्रमुख आकर्षण बाबा बर्फानी अमरनाथ (भव्यदिव्य बर्फाचे शिवलिंग) व मंदिर गाभारा सजावट हे भाविकांसाठी मुख्य आकर्षण आणि मनमोहक दृश्य होते. यामुळे संपूर्ण परिसरात अमरनाथ गुहेसारखे पवित्र आणि प्रसन्न वातावरण निर्माण झाले. तसेच राधिका गृप यांच्या भजनाच्या सुरांनी वातावरणात भक्तीरस निर्माण केला. सामूहिक भजनामुळे भाविकांच्या मनाला आध्यात्मिक शांतता आणि ऊर्जा मिळाली. केवळ धार्मिक विधींवर मर्यादित न राहता वृक्षारोपण सामाजिक संदेश देऊन करून श्री वैभव आहेर यांनी पर्यावरणाचा समतोल राखण्याचा मोठा संदेश दिला आहे. ही काळाची गरज असून एक उत्तम सामाजिक पाऊल आहे.असे प्रतिपादन महेश कांबळे यांनी केले.

यावेळी संपत बारस्कर यांच्या हस्ते त्यांच्याच प्रेरणेने आंब्याची मोठी रोपे मंदिर परिसरात लावण्यात आली .कार्यक्रम संपल्यावर सर्वासाठी महाप्रसाद आयोजित करण्यात आला होता त्याचा लाभ असंख्य भाविकांनी घेतला

# नेवासा तालुका ग्रेडपात्र मुख्याध्यापक संघाच्या अध्यक्षपदी हरिभाऊ जाधव यांची सर्वानुमते निवड

### सुरेगाव येथे माजी विद्यार्थ्यांकडून सत्कार समारंभ

**नेवासा (समर्थ गांवकरी)**

शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सदैव तत्पर असलेल्या नेवासा तालुक्यातील गुरुजनांचा गौरव वाढवणारी एक आनंदाची बातमी समोर आली आहे. नेवासा तालुका 'ग्रेडपात्र मुख्याध्यापक संघाच्या' अध्यक्षपदी सुरेगाव (गंगा) येथील जि.प. प्राथमिक शाळेचे, हसतमुख व कर्तव्यकठोर मुख्याध्यापक हरिभाऊ जाधव यांची निवड करण्यात आली आहे. या निवडीमुळे नेवासा तालुक्यासह सुरेगाव (गंगा) परिसरात आनंदाचे व अभिमानाचे वातावरण पसरले आहे.

माजी अध्यक्ष व शिक्षक संघटनेचे राज्य नेते कल्याणराव शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच एक महत्त्वाची कार्यकारिणी बैठक पार पडली. या बैठकीत सर्वानुमते नवीन पदाधिकाऱ्यांची निवड जाहीर करण्यात आली. यामध्ये हरिभाऊ जाधव यांच्याकडे अध्यक्षपदाची धुरा सोपवण्यात आली असून, कार्याध्यक्षपदी गणेश शेलार तर सचिव पदाची जबाबदारी आसिफ शेख यांच्याकडे सोपवण्यात आली आहे. शिक्षण क्षेत्रातील त्यांचा प्रदीर्घ अनुभव आणि कर्तृत्व पाहताच ही निवड योग्य व्यक्तीच्या हाती योग्य जबाबदारी देणारी ठरली आहे, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.



हरिभाऊ जाधव यांच्या या प्रेरणादायी निवडीबद्दल सुरेगाव (गंगा) येथील जि.प. प्रा. शाळेच्या माजी विद्यार्थ्यांच्या वतीने त्यांचा अत्यंत उत्साहात सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला.

या सत्कार सोहळ्याप्रसंगी सामाजिक कार्यकर्ते भाऊसाहेब पारखे(खिर्डी) भागवत चितळकर,शाळा व्यवस्था समितीचे अध्यक्ष संदीप शिंदे, पत्रकार प्रल्हाद शिंदे, अंकुश शिंदे, लक्ष्मण शिंदे, प्रा.पुराने सर,गोविंद माळवे, विठ्ठलअप्पा शिंदे, बाळकृष्ण शिंदे व सर्व शिक्षक वृंद यांच्यासह गावातील अनेक माजी विद्यार्थी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित सर्व मान्यवरांनी नवनिर्वाचित अध्यक्ष श्री.हरिभाऊ जाधव यांचे पुष्पगुच्छ व शाल श्रीफळ देऊन स्वागत केले आणि त्यांच्या भावी शैक्षणिक व सामाजिक वाटचालीस भरभरून शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या शेवटी मुख्याध्यापक जाधव सर यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानले.

# गरजू महिलांच्या हाताला मिळाला रोजगाराचा आधार

### श्रीराजहंस फाउंडेशनतर्फे वडझिरे येथे शिलाई मशीन व आटा चक्कीचे वाटप

**पारनेर (समर्थ गांवकरी)**

महिलांना स्वावलंबी बनवून त्यांच्या कुटुंबाच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा घडवून आणण्याच्या उद्देशाने श्रीराजहंस फाउंडेशनच्या वतीने पारनेर तालुक्यातील वडझिरे येथे गरजू महिलांना शिलाई मशीन व आटा चक्कीचे वाटप करण्यात आले. ग्रामपंचायत कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमाला ग्रामस्थ व लाभार्थी महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

यावेळी श्रीराजहंस फाउंडेशन संस्थापक महेंद्र लोखंडे, संचालिका वैशाली लोखंडे,जिल्हा व्यवस्थापक सविता आढाव, पारनेर तालुका व्यवस्थापक रेश्मा मण्यार, आढाव ,पत्रकार भगवान गायकवाड यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते लाभार्थींना शिलाई मशीन व आटा चक्कीचे वितरण करण्यात आले.



यावेळी सविता आढाव यांनी फाउंडेशनच्या विविध सामाजिक उपक्रमांची माहिती दिली. समाजातील वंचित व गरजू घटकांना मदत करणे, महिलांना स्वावलंबी बनविण्यासाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, विद्यार्थ्यांना शैक्षणिक मार्गदर्शन करणे, आरोग्य शिबिरे व जनजागृती मोहिमा राबविणे, तसेच संस्कृती व परंपरेचे संवर्धन करण्यासाठी संस्था कार्यरत असल्याचे त्यांनी सांगितले. तरुणांसाठी क्रीडा संधी, शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शन व सहाय्य तसेच पर्यावरण संवर्धनासाठी विविध उपक्रमही राबविले जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.सशक्त नागरिक प्रगत समाज उज्वल भविष्य' या ध्येयाने श्रीराजहंस फाउंडेशन कार्यरत असून, 'शिक्षण, आरोग्य, संस्कार आणि संधी – सर्वांसाठी' हे संस्थेचे ब्रीदवाक्य आहे. समाजातील प्रत्येक घटकाने या सामाजिक कार्यात सहभागी व्हावे, स्वयंसेवक म्हणून योगदान द्यावे आणि गरजू विद्यार्थ्यांना तसेच समाजातील वंचित घटकांना सहकार्य करावे, असे आवाहन फाउंडेशनच्या वतीने करण्यात आले.

# भाजप प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनी केली भुईकोट किल्ल्याची पाहणी

### संबंधित ठेकेदार व अधिकाऱ्यांकडून घेतली मंजूर कामांच्या आराखड्याची माहिती; प्रत्यक्ष जागेवर घेतला आढावा

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

शहरालगतच्या ऐतिहासिक भुईकोट किल्ल्याच्या संवर्धन आणि पर्यटनाच्या दृष्टीने मंजूर करण्यात आलेल्या कामांच्या पार्श्वभूमीवर भाजप प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनी किल्ल्याची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी संबंधित अधिकारी व ठेकेदारांकडून मंजूर झालेल्या कामांच्या संपूर्ण आराखड्याची माहिती घेत, प्रत्यक्षात किल्ल्याच्या कोणत्या भागात काय होणार आहे, याचा जागेवरच आढावा घेतला.

डॉ. विखे पाटील यांनी अधिकाऱ्यांसमवेत किल्ल्याच्या विविध भागांची पाहणी केली. प्रस्तावित कामांची रचना, ऐतिहासिक वास्तूंचे जतन, परिसराचे नियोजन तसेच पर्यटकांच्या दृष्टीने करण्यात येणाऱ्या सुविधांबाबत त्यांनी संबंधितांकडून सविस्तर माहिती जाणून घेतली.

पाहणीदरम्यान आराखड्यातील कामांची प्रत्यक्ष जागेशी सांगड घालत आवश्यक त्या बाबींवर त्यांनी अधिकाऱ्यांशी चर्चा केली. ज्या ठिकाणी आवश्यक बदल किंवा सुधारणा करणे गरजेचे आहे, त्याबाबतही त्यांनी संबंधितांना सूचना केल्या. ऐतिहासिक वारशाचे मूळ स्वरूप आणि महत्त्व जपतच पुढील नियोजन करण्यात यावे, यावर त्यांनी विशेष भर दिला.

भुईकोट किल्ल्याच्या नूतनीकरणासाठी निधी मंजूर झाल्यानंतर लष्करी प्रशासनासोबतचा सामंजस्य करार (चजण) हा महत्त्वाचा टप्पा होता. हा विषय मार्गी लागण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी , संरक्षण मंत्री राजनाथ सिंह , मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब, उपमुख्यमंत्री, एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार तसेच पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील साहेब तसेच आमदार संग्राम जगताप यांच्या पातळीवर झालेल्या प्रयत्न आणि पाठपुराव्यामुळे चजण पूर्ण झाला असून, आता मंजूर आराखड्यानुसार पुढील प्रक्रिया मार्गी लागली आहे.

किल्ल्याशी संबंधित ऐतिहासिक वास्तू, स्वातंत्र्यलढ्याच्या स्मृती आणि महत्त्वपूर्ण ऐतिहासिक संदर्भांचे जतन करून ते नव्या पिढीसमोर प्रभावीपणे मांडण्याचे नियोजन आहे. 'ऊळीर्लेशीू ष खपवळर'सह सरदार वल्लभभाई पटेल आणि पंडित जवाहरलाल नेहरू यांच्याशी संबंधित ऐतिहासिक संदर्भांनाही या माध्यमातून उजाळा मिळणार आहे.



भुईकोट किल्ला हा अहिल्यानगरच्या इतिहासाचा आणि अस्मितेचा महत्त्वाचा ठेवा आहे. या ऐतिहासिक वारशाचे संवर्धन करत त्याला पर्यटनाच्या दृष्टीने नवी ओळख मिळवून देण्याच्या दृष्टीने मंजूर आराखड्याची प्रत्यक्ष पाहणी करून डॉ. विखे पाटील यांनी कामाच्या नियोजनाचा आढावा घेतला.

यावेळी संबंधित अधिकारी, ठेकेदार आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.

पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे

पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : अ-१, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# थोडक्यात पण महत्त्वाचे

## पुण्यात स्पर्धा परिक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्याची आत्महत्या,

पुणे (समर्थ गांवकरी)

विद्येचे माहेरघर असलेल्या पुण्यामध्ये स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या एका तरुणाने जीवन संपवल्याची घटना घडली आहे. या घटनेमुळे स्पर्धा परिक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये चांगलीच खळबळ उडाली आहे. मुंबई, पुणे, छत्रपती संभाजीनगर आणि नाशिक सारख्या महत्त्वाच्या शहरांत महाराष्ट्रातल्या कानाकोपऱ्यांतून तरूण स्पर्धा परिक्षेची तयारी करण्यासाठी येत असतात. ग्रामीण भागांतून पुण्यामध्ये अधिकारी होण्याचे स्वप्न घेऊन आलेल्या होतकरू तरुणाने आत्महत्या करत आपले जीवन संपवले आहे. आत्महत्या करणाऱ्या तरूणाचे नाव प्रथमेश देशमुख असं आहे. पुण्याच्या नारायण पेठ परिसरामध्ये राज्यसेवा आयोगाच्या परिक्षेची तयारी करण्यासाठी आलेल्या २५ वर्षीय तरुणाने सुसाईड नोट लिहित आपले जीवन संपवले आहे. प्रथमेश दिलीप देशमुख (मूळ रा. खासापुरी, ता. परंडा, जि. धाराशिव) असे या तरुणाचं नाव असून, तो गेल्या दीड ते दोन वर्षांपासून पुण्यामध्ये राहून स्पर्धा परीक्षांची तयारी करत होता. प्रथमेशने सततची आर्थिक टंचाई आणि डोक्यावर झालेला कर्जाचा भार यामुळे आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. तरूणाने आत्महत्येचं कारण सुसाईड नोटमध्ये स्पष्ट केले आहे.

## 'उत्सव शब्द सुरांचा ध्यास मराठीचा'मधून मराठी कवितेचा स्वरमय जागर

मुंबई (समर्थ गांवकरी)

मराठी भाषा, साहित्य आणि काव्यपरंपरेचा समृद्ध वारसा रसिकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांच्या सहयोगाने तसेच एनसीपीए 'पेज टू स्टेज' आणि 'अक्षरकाव्य' यांच्या संयुक्त विद्यमाने 'उत्सव शब्दसुरांचा ध्यास मराठीचा' या विशेष मराठी कवितेच्या उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवार, १० सप्टेंबर २०२६ रोजी सायं. ६.३० वाजता एनसीपीएच्या लिटल थिएटर येथे हा विशेष काव्य-सांगीतिक कार्यक्रम होणार आहे. मराठी साहित्यविश्वातील विविध कालखंडांतील मान्यवर कवींच्या काव्यरचनांचा स्वरमय आविष्कार या कार्यक्रमातून रसिकांना अनुभवता येणार आहे. या कार्यक्रमामध्ये सुरेश भट, कुसुमाग्रज, विंदा करंदीकर, ग्रेस, बहिणाबाई चौधरी, शांताबाई शेळके, मंगेश पाडगावकर तसेच संत ज्ञानेश्वर यांच्या निवडक काव्यरचनांचे सादरीकरण करण्यात येणार आहे. मराठी कवितेतील भावविश्व, सामाजिक जाणिवा, प्रेम, निसर्ग, अध्यात्म आणि मानवी संवेदनांचा विविधांगी आविष्कार या कार्यक्रमातून रसिकांसमोर उलगडणार आहे.या विशेष कार्यक्रमात पल्लवी देशपांडे, सुप्रिया देशपांडे, शीतल देशपांडे आणि प्रज्ञा लाळींगकर हे कलाकार काव्यरचनांचे सादरीकरण करणार आहेत. त्यांना प्रमोद जाधव आणि संजय मायकेकर यांची साथसंगत लाभणार आहे. काव्य आणि संगीत यांच्या सुरेल मिलाफातून मराठी कवितेचा भावस्पर्शी अनुभव रसिकांना मिळणार आहे.

## मराठवाड्यात ३ लाख १६ हजारांहून अधिक कुणबी प्रमाणपत्रांचे वाटप

छत्रपती संभाजीनगर(समर्थ गांवकरी)

मराठवाड्यात कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा प्रमाणपत्रांच्या प्रक्रियेला गती देण्यासाठी शासनाकडून सातत्याने कार्यवाही करण्यात येत असून, आतापर्यंत प्राप्त झालेल्या ३ लाख १७ हजार ५६९ अर्जांपैकी ३ लाख १६ हजार ९७७ नागरिकांना कुणबी प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले आहे. तसेच जात पडताळणीसाठी प्राप्त २१ हजार ५१ अर्जांपैकी १६ हजार ११० प्रकरणांमध्ये जात पडताळणी प्रमाणपत्रे देण्यात आली आहेत. शासनाची कार्यवाही पारदर्शक असून, मराठा समाजाला कायदेशीर व टिकणारे आरक्षण देण्याची शासनाची सकारात्मक भूमिका असल्याची माहिती मराठी भाषा व उद्योगमंत्री डॉ. उदय सामंत यांनी स्मार्ट सिटी कार्यालयात पत्रकारांशी संवाद साधताना दिली. यावेळी आमदार प्रसाद लाड उपस्थित होते. शिंदे समिती स्थापन झाल्यानंतर मराठवाड्यात करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती देताना मंत्री डॉ. सामंत म्हणाले की, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, बीड, लातूर आणि धाराशिव या आठ जिल्ह्यांमध्ये कुणबी प्रमाणपत्राच्या प्रक्रियेला गती देण्यात आली आहे. एकूण ३,१७,५६९ अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी ३,१६,९७७ प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली आहेत. याशिवाय २,९५,३०५ प्रमाणपत्रे १० टक्के आरक्षणाच्या अनुषंगाने देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. जात पडताळणी प्रक्रियेबाबत माहिती देताना मंत्री डॉ. सामंत यांनी सांगितले की, मराठवाड्यात २१,०५१ अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी १६,११० प्रकरणे निकाली काढून प्रमाणपत्रे देण्यात आली आहेत. या प्रक्रियेत केवळ ६४ प्रकरणे नामंजूर झाली असून, ही संख्या एकूण अर्जांच्या तुलनेत सुमारे ०.३ टक्के आहे. उर्वरित प्रकरणांवरही नियमानुसार कार्यवाही सुरू असून, नागरिकांना आवश्यक त्या प्रमाणपत्रांची पूर्तता करून देण्यासाठी प्रशासनाला निर्देश देण्यात आले आहेत. शासनाने उपलब्ध करून दिलेल्या जुन्या अभिलेखांच्या माध्यमातूनही नागरिकांना मोठ्या प्रमाणात सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. आतापर्यंत शोधण्यात आलेल्या ५७ लाख नोंदी जनतेला पाहता याव्यात यासाठी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

# कचऱ्यातून समृद्धीचा मंत्र; वसुंधरा अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी घेतला गांडूळखत निर्मितीचा प्रत्यक्ष धडा

## कोतुळ येथील गांडूळखत प्रकल्पाला इयत्ता सहावीच्या ७६ विद्यार्थ्यांची शैक्षणिक क्षेत्रभेट




अकोले (समर्थ गांवकरी)

अभिनव शिक्षण संस्थेच्या वसुंधरा अकॅडमी, अकोले येथील इयत्ता सहावीच्या ७६ विद्यार्थ्यांनी सोमवार, दि. ७ सप्टेंबर २०२६ रोजी कोतुळ येथील श्री. महेश राजगुरू यांच्या गांडूळखत निर्मिती प्रकल्पाला शैक्षणिक क्षेत्रभेट दिली. 'गांडूळखत निर्मिती व शाश्वत कचरा व्यवस्थापन' या विषयावर आयोजित या क्षेत्रभेटीत विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष अनुभवातून पर्यावरणपूरक कचरा व्यवस्थापनाचे धडे घेतले. या क्षेत्रभेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी गांडूळखत निर्मितीची प्रक्रिया, सेंद्रिय कचऱ्याचे विघटन, गांडुळांची भूमिका तसेच जैवविघटनशील कचऱ्याचे योग्य वर्गीकरण व व्यवस्थापन याविषयी सविस्तर माहिती घेतली. सेंद्रिय कचऱ्यापासून उपयुक्त खताची निर्मिती कशी केली जाते, त्यासाठी आवश्यक परिस्थिती कोणती असते आणि तयार झालेले गांडूळखत मातीची सुपीकता वाढविण्यासाठी कसे उपयुक्त ठरते, याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांनी पाहिले.

श्री. महेश राजगुरू यांनी गांडूळखत निर्मितीच्या विविध टप्प्यांची विद्यार्थ्यांना माहिती देत त्यामागील शास्त्रीय प्रक्रिया समजावून सांगितली. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे प्रश्न विचारून आपल्या शंकांचे निरसन करून घेतले. तसेच 'कमी वापरा, पुनर्वापर करा आणि पुनर्चक्रण करा' या त्रिसूत्रीचे महत्त्व जाणून घेतले. विद्यार्थ्यांनी महत्त्वपूर्ण निरीक्षणांची नोंद आपल्या कौशल्यबोधाच्या वहीत केली. घरात व शाळेत पर्यावरणपूरक कचरा व्यवस्थापनाच्या पद्धतींचा अवलंब कसा करता येईल, यावरही त्यांनी चर्चा केली.

या क्षेत्रभेटीमुळे विद्यार्थ्यांमध्ये निरीक्षणशक्ती, चिकित्सक विचार, संवादकौशल्य, प्रश्न विचारण्याची क्षमता, सहकार्याची भावना आणि पर्यावरणीय जबाबदारीची जाणीव विकसित झाली. पाठ्यपुस्तकातील ज्ञान प्रत्यक्ष कृतीशी जोडण्याची संधी मिळाल्याने विद्यार्थ्यांचा अनुभव अधिक समृद्ध झाला. सेंद्रिय कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन केल्यास त्याचे उपयुक्त संसाधनात रूपांतर करता येते, हा महत्त्वपूर्ण संदेश विद्यार्थ्यांना मिळाला. वसुंधरा अकॅडमीमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाबरोबरच त्यांच्या अंगभूत कौशल्यांना योग्य दिशा देण्यासाठी विविध उपक्रम, प्रात्यक्षिके, क्षेत्रभेटी आणि अनुभवाधारित शिक्षणावर विशेष भर दिला जातो. विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकी ज्ञान न घेता ते प्रत्यक्ष जीवनाशी जोडावे, स्वतः निरीक्षण करावे, प्रश्न विचारावेत, समस्यांचा अभ्यास करावा आणि सर्जनशील उपाय शोधावेत, यासाठी शाळेकडून सातत्याने विविध संधी उपलब्ध करून दिल्या जातात. विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासासाठी वसुंधरा अकॅडमीच्या प्राचार्य डॉ. जयश्री देशमुख आणि उपप्राचार्या राधिका नवले यांचे विद्यार्थ्यांना सातत्याने मार्गदर्शन व प्रोत्साहन मिळते.

विद्यार्थ्यांमधील सुप्त गुण ओळखून त्यांना योग्य व्यासपीठ उपलब्ध करून देणे, विविध उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रेरित करणे आणि त्यांच्या सर्जनशील कल्पनांना वाव देणे, यासाठी शाळा प्रयत्नशील असते.

अभ्यासाबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, संवादकौशल्य, निरीक्षणशक्ती, चिकित्सक विचार, सर्जनशीलता, सहकार्याची भावना तसेच सामाजिक व पर्यावरणीय जाणीव विकसित व्हावी, यासाठी विविध उपक्रम राबविले जातात. 'करून शिकणे' या संकल्पनेमुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून ज्ञान आत्मसात करण्याची संधी मिळते. त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढण्याबरोबरच जबाबदार आणि संवेदनशील नागरिक म्हणून घडण्यासही मदत होते.वसुंधरा अकॅडमीचे शिक्षण हे वर्गखोलीच्या चौकटीपुरते मर्यादित न ठेवता विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष अनुभवांना, कौशल्यांना आणि सर्जनशीलतेला प्रोत्साहन देणारे आहे. या क्षेत्रभेटीतून विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धनाचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला असून, शाश्वत जीवनशैलीचा संदेशही त्यांच्या मनावर बिंबला. या शैक्षणिक क्षेत्रभेटीसाठी पुनम शेटे, कल्पना मंडलिक, ऋतुजा वराडे, पंकज धुमाळ आणि प्रशांत दिवेकर या शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व सहकार्य केले. विद्यार्थ्यांनी शिस्तबद्धपणे आणि उत्साहाने सहभाग नोंदवून ही क्षेत्रभेट यशस्वी केली.

# राष्ट्रीय दीपस्तंभ पुरस्काराने सन्मानित सागर भालेराव यांचा के. बी. रोहमारे महाविद्यालयात सत्कार



कोपरगाव (समर्थ गांवकरी)

सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्याची दखल घेत राष्ट्रीय दीपस्तंभ पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले सागर रामनाथ भालेराव यांचा के. बी. रोहमारे महाविद्यालयाच्या वतीने नुकताच सत्कार करण्यात आला. महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डी. आर. सोनवणे यांच्या हस्ते भालेराव यांचा सन्मान करण्यात आला.

धोंडेवाडी, ता. कोपरगाव येथील सागर भालेराव यांनी सामाजिक क्षेत्रासह विविध क्षेत्रांत केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना राष्ट्रीय स्तरावरील दीपस्तंभ पुरस्कार जाहीर करण्यात आला होता. या पुरस्कारामुळे ग्रामीण भागातील कार्यकर्त्यांच्या सामाजिक कार्याला निश्चितच प्रेरणा मिळाली आहे.

पुरस्कार प्राप्त झाल्यानंतर महाविद्यालयातर्फे त्यांचा विशेष गौरव करण्यात आला. यावेळी प्रभारी प्राचार्य डी. आर. सोनवणे यांनी सागर भालेराव यांच्या कार्याचे कौतुक करत त्यांच्या पुढील सामाजिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी महाविद्यालयातील सर्व शिक्षक-शिक्षिका उपस्थित होते. सागर भालेराव यांना मिळालेल्या राष्ट्रीय पुरस्काराबद्दल महाविद्यालयाच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.

# पाच दिवसांत जादा बस सुरू करा, अन्यथा आंदोलन छेडू; विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी बाळासाहेब गव्हाणेंचा एसटी प्रशासनाला इशारा

कोपरगाव (समर्थ गांवकरी)



तळेगाव दिघे मार्गे जवळके-कोपरगाव या मार्गावर सकाळच्या वेळेत बसची संख्या अपुरी असल्याने विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणात शैक्षणिक नुकसान होत आहे. या गंभीर प्रश्नाची तातडीने दखल घेत सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब गव्हाणे यांनी विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी आक्रमक भूमिका घेतली असून, पाच दिवसांच्या आत या मार्गावर जादा बसफेऱ्या सुरू करा; अन्यथा आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा दिला आहे.

तळेगाव दिघे मार्गे जवळके-कोपरगाव या मार्गावरून राजनगाव देशमुख, अंजनापूर, वेस, जवळके, धोंडेवाडी, बहादरपूर, बहादराबाद, शहापूर आदी गावांमधील असंख्य विद्यार्थी-विद्यार्थिनी दररोज कोपरगाव येथे शाळा, महाविद्यालय तसेच विविध शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षणासाठी ये-जा करतात. मात्र, सकाळच्या वेळेत या मार्गावर बसफेऱ्या अपुऱ्या असल्याने विद्यार्थ्यांना मोठ्या गर्दीचा सामना करावा लागत आहे.

उपलब्ध बसमध्ये क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी असल्याने अनेक विद्यार्थ्यांना बसमध्ये चढताही येत नाही. परिणामी त्यांना पुढील बसची प्रतीक्षा करावी लागते. यामुळे शाळा-महाविद्यालयात वेळेवर पोहोचता येत नसून, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वेळेचे आणि अभ्यासाचे नुकसान होत आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे शिक्षण हे त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाचे असून, केवळ वाहतुकीच्या सुविधेअभावी त्यांचे नुकसान होणे ही गंभीर बाब आहे, असे बाळासाहेब गव्हाणे यांनी म्हटले आहे. विद्यार्थ्यांच्या अडचणी केवळ ऐकून न घेता त्यासाठी प्रत्यक्ष पाठपुरावा करणारे सामाजिक कार्यकर्ते म्हणून गव्हाणे यांनी हा प्रश्न लावून धरला आहे.

विद्यार्थ्यांच्या शिक्षणाशी आणि भविष्यासोबत कोणतीही तडजोड सहन केली जाणार नाही. कोपरगाव आगाराने पाच दिवसांच्या आत सकाळच्या वेळेत किमान एक-दोन जादा बसफेऱ्या सुरू कराव्यात. अन्यथा विद्यार्थी, पालक व नागरिकांना सोबत घेऊन आंदोलन करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब गव्हाणे यांनी दिला.

एसटी प्रशासनाने विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करून या मागणीची तातडीने दखल घ्यावी आणि तळेगाव दिघे-जवळके-कोपरगाव मार्गावर सकाळच्या वेळेत जादा बस सुरू करावी, अशी मागणी विद्यार्थी, पालक व परिसरातील नागरिकांकडून होत आहे.

# ग्रामसभा अधिक सक्षम, सुरक्षित व प्रभावी करण्यासाठी कायद्यात दुरुस्तीचा पाठपुरावा

## आमदार काशिनाथ दाते यांचे आश्वासन; तांत्रिक ग्रामपंचायत अधिकारी संघटनेचे निवेदन

पारनेर (समर्थ गांवकरी)

ग्रामसभा ही ग्रामीण लोकशाहीचे सर्वोच्च व्यासपीठ असून, तिची कार्यपद्धती अधिक सुरक्षित, शिस्तबद्ध, पारदर्शक आणि निर्णयक्षम करण्यासाठी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मधील कलम ७ तसेच ग्रामसभेच्या बैठकीसंदर्भातील नियमांचे पुनर्विलोकन करून आवश्यक कायदेशीर सुधारणा करण्यात याव्यात. यासाठी राज्य सरकारकडे प्रभावी पाठपुरावा करण्यात येईल, अशी ग्वाही पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांनी दिली.महाराष्ट्र राज्य तांत्रिक ग्रामपंचायत अधिकारी संघटनेच्या शिष्टमंडळाने पारनेर येथील कार्यालयात आमदार दाते यांची भेट घेऊन ग्रामसभांच्या विद्यमान कार्यपद्धतीत सुधारणा करण्याबाबत निवेदन सादर केले.

यावेळी ग्रामसभेच्या कामकाजातील अडचणी, अधिकारी-कर्मचाऱ्यांची सुरक्षितता तसेच निर्णयप्रक्रिया अधिक पारदर्शक करण्याबाबत चर्चा झाली.बदलत्या परिस्थितीत ग्रामसभेच्या विद्यमान कार्यपद्धतीचे पुनर्विलोकन करण्याची आवश्यकता असल्याचे संघटनेने निदर्शनास आणून दिले. अलीकडे ग्रामसभा सुरू असताना अधिकारी-कर्मचाऱ्यांशी झालेल्या मारहाणीच्या घटना, तसेच ग्रामसभांमध्ये होणारे वाद, गोंधळ व तणावपूर्ण परिस्थिती यामुळे सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर झाला आहे. त्यामुळे ग्रामसभा घेणाऱ्या अधिकारी, कर्मचारी तसेच ग्रामस्थांच्या सुरक्षिततेसाठी स्पष्ट कायदेशीर संरक्षण व आवश्यक प्रशासकीय उपाययोजना करणे गरजेचे असल्याचे संघटनेने म्हटले.

ग्रामसभा बंद करणे हा संघटनेचा हेतू नसून, उलट ग्रामसभा अधिक सक्षम, सुरक्षित, पारदर्शक व प्रभावी करण्यासाठी कायदे व नियमांमध्ये आवश्यक सुधारणा कराव्यात, अशी संघटनेची भूमिका आहे.



निवेदनात संविधानातील अनुच्छेद २४३अ व संबंधित कायदे-नियमांचे पुनर्विलोकन, वारंवार स्वतंत्र ग्रामसभा घेण्याऐवजी वर्षातून एक सर्वसमावेशक ग्रामसभा घेण्याची व्यवस्था, डिजिटल ग्रामसभेला कायदेशीर मान्यता, वैयक्तिक लाभाच्या योजनांसाठी महाडीबीटीद्वारे पारदर्शक लाभार्थी निवड तसेच ग्रामपंचायत अधिकारी-कर्मचाऱ्यांना कायदेशीर संरक्षण देण्याच्या मागण्या करण्यात आल्या.

या मागण्यांबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे व राज्यमंत्री योगेश कदम यांच्याकडे पाठपुरावा करण्याचे आश्वासन आमदार दाते यांनी दिले. तसेच संघटनेच्या राज्यस्तरीय शिष्टमंडळाची मुंबई येथे वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत बैठक आयोजित करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असेही त्यांनी सांगितले.यावेळी राज्यसचिव हरिश्चंद्र काळे, तालुकाध्यक्ष विशाल झावरे, तालुका सचिव शरद गायकवाड यांच्यासह संदीप माळी, प्रदीप कडूस, सुनील दरेकर, संतोष गायकवाड व तालुक्यातील ग्रामपंचायत अधिकारी उपस्थित होते.

# ऑनलाईन सातबारा नोंदीसाठी ५ हजारांची लाच

## नगर तालुक्यात महिला मंडळाधिकारी अटकेत

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

खरेदी केलेल्या प्लॉटची सातबारा उताऱ्यावर ऑनलाईन नोंद करण्यासाठी ५ हजार रुपयांची लाच मागून ती स्वीकारण्याची तयारी दर्शविल्याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने महिला मंडळाधिकाऱ्याला अटक केली आहे. श्रीमती संगीता नारायण पुंड (वय ३७, मंडळाधिकारी कार्यालय, कापूरवाडी, वर्ग-३) असे अटकेतील लोकसेवकाचे नाव आहे.

तक्रारदार हे व्यवसायाने चालक असून त्यांनी व त्यांच्या मित्राने मौजे बुऱ्हाणनगर येथील गट नं. ६ प्लॉट नं. ४९ मधील २१०.९० चौ.मी. क्षेत्र खरेदी केले होते. त्याची नोंद फेरफार क्र. ६८०२ अन्वये झाली होती, मात्र संगणकीय सातबारा होताना ती कार्यान्वित झाली नव्हती. त्यासाठी त्यांनी ८ डिसेंबर २०२५ रोजी तहसीलदारांकडे अर्ज केला होता. या अर्जाची चौकशी पुंड यांच्याकडे होती.

दि. २४ जुलै २०२६ रोजी तक्रारदार भेटीस गेले असता पुंड यांनी संगणकीकृत नोंद पूर्ण करण्यासाठी ५ हजारांची मागणी केली. तेव्हा तक्रारदाराने १ हजार रुपये दिले. उर्वरित ४ हजार रुपयांच्या मागणीबाबत तक्रार एसीबीकडे करण्यात आली.

दि. २७ जुलै २०२६ रोजी मंडळाधिकारी कार्यालय, कापूरवाडी येथे पडताळणी कारवाई केली असता पुंड यांनी यापूर्वी १ हजार रुपये स्वीकारल्याचा दुजोरा देऊन उर्वरित ४ हजारांची मागणी करून ती स्वीकारण्याची तयारी दर्शविली.

# डोळ्यात चटणी टाकून १० लाख ५० हजार लुटल्याचा बनाव उघडकीस; खर्डा पोलिसांकडून तक्रारदारावरच गुन्हा दाखल

जामखेड (समर्थ गांवकरी)

जामखेड-खर्डा हायवेवर डोळ्यात मिरची पूड टाकून १० लाख ५० हजार रुपये आणि मोबाईल लुटल्याची खोटी माहिती देऊन पोलिसांची दिशाभूल करणाऱ्या इसमाचा बनाव खर्डा पोलिसांनी अत्यंत तत्परतेने उघडकीस आणला आहे. या प्रकरणी तक्रारदारावरच खर्डा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की दि ८ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी १२ वाजेच्या सुमारास खर्डा पोलीस स्टेशनला 'डायल ११२' वर एक कॉल प्राप्त झाला. सतेवाडी फाट्याजवळ बालाजी अर्जुन लांडगे (वय ३९, रा. सुर्वेगल्ली, खर्डा) यांच्या डोळ्यात मिरची पूड टाकून १० लाख ५० हजार रुपये आणि मोबाईल लुटल्याचा दावा कॉलरने केला. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश जाधव, पोलीस उपनिरीक्षक अशोक खेडकर व सहकाऱ्यांचे पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले.

पुण्याहून खर्डा येथे येत असताना विना नंबरच्या दोन स्प्लेंडर मोटरसायकलवरून आलेल्या इसमांनी गाडी अडवून लुटल्याचा दावा तक्रारदाराने केला होता. मात्र, पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी केली असता कोणतीही संशयास्पद बाब आढळून आली नाही. तसेच जामखेड रोडवरील सर्व सी.सी.टी.व्ही. फुटेज तपासले असता तक्रारदाराने सांगितलेल्या वर्णनाची कोणतीही गाडी तिथून गेल्याचे दिसुन आले नाही.

त्यानंतर पोलिसांनी बालाजी लांडगे यांची अधिक सखोल व कसून चौकशी केली असता, त्यांनी रचलेला बनाव उघडा पडला. खर्डा शहरातील लोकांचे घेतलेले देणे परत करावे लागू नये, यासाठी हा सर्व बनाव रचल्याची कबुली तक्रारदाराने दिली.

पोलीस यंत्रणेची दिशाभूल करून खोटी माहिती दिल्याप्रकरणी बालाजी अर्जुन लांडगे याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम २१२ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे. सदर कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. सुदर्शन मुमक्का, अपर पोलीस अधीक्षक श्री. वैभव कलुबर्गे, उपविभागीय पोलीस अधिकारी सुजितकुमार क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि गणेश जाधव, पोउनि अशोक खेडकर, संभाजी शेंडे, शशी म्हस्के, बाळू खाडे, राहुल खेडकर आणि प्रवीण थोरात यांच्या पथकाने केली. पुढील तपास पोहेकॉ संभाजी शेंडे करत आहेत.

पोलीस प्रशासन आवाहन




डायल ११२ ही सुविधा नागरिकांच्या तातडीच्या सुरक्षेसाठी व आपत्कालीन मदतीसाठी आहे. या क्रमांकावर कॉल करून खोटी माहिती दिल्यास किंवा विनाकारण त्रास दिल्यास संबंधित इसमावर कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल.

उज्वलसिंह राजपूत, सहाय्यक पोलीस निरीक्षक, खर्डा पोलीस स्टेशन